



# गोदातीर समाचार

स्थापना - १९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे | * अंक २०१ | * नांदेड | * सोमवार, दि. २८ जुलै २०२५ | * पृष्ठे ६ | * किंमत २ रुपये | ☎ : 255777, Fax :252211

# राज ठाकरेंकडून 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

## आनंद द्विगुणित झाला -उद्धव ठाकरे यांची प्रतिक्रिया



**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे 'मातोश्री' बंगल्यावर आले. त्यांना उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आपल्याला आनंद द्विगुणित झाल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. या निमित्ताने पुन्हा एकदा ठाकरे बंधू युती करणार का याची चर्चा सुरू झाली आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसेकडून विजयी मेळावा झाल्यानंतर युती करणार की नाही, याबाबत दोघांनीही भुमिका जाहीर केली नाही. परंतु राज ठाकरे हे उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मातोश्रीवर गेल्याने पुन्हा एकदा ठाकरे बंधुंची युती होणार, याची चर्चा सुरू झाली आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन्ही पक्षांची ताकद महाराष्ट्रात ठराविक भागांमध्येच आहे. यातही मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर ही अशी शहरे आहेत जिथे हे दोन्ही पक्ष एकमेकांची राजकीय जागा बळकावू इच्छित आहेत. उद्धव आणि राज या दोघांनाही आदेश देणे आवडते. यातूनच काही वर्षांपूर्वी राजकीय संघर्ष झाला होता. त्यानंतर पुन्हा हे बंधू एकत्र येत असल्याचे चित्र दिसत आहे.

**राज्याच्या मनात काय ते निवडणुकीत दिसेल –फडणवीस**

उद्धवजींचा जन्मदिवस आहे, त्यांना शुभेच्छा द्यायला राज ठाकरे गेले होते ही आनंदाची गोष्ट आहे. आमच्याही शुभेच्छा उद्धव ठाकरेंना आहेत. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गेल्यावर त्यात राजकारण पाहणं योग्य नाही. राज्याच्या मनात काय आहे ते आपल्याला विधानसभा निवडणूकीत दिसलं आहे. आता महाराष्ट्राच्या मनात काय आहे ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीतही दिसेल. आता काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे ते महाराष्ट्राच्या मनात आहे असं म्हणणं योग्य ठरणार नाही. असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## इंग्लंडविरूद्ध इंडिया चौथा कसोटी सामना अनिर्णित

**मुंबई (प्रतिनिधी)–** इंग्लंडविरुद्ध इंडिया यांच्यातील चौथा कसोटी सामना अनिर्णित राहिला आहे. भारतीय संघाने मँचेस्टरमध्ये सामना वाचवण्यात यश मिळवलं आहे.

शुबमन गिल याच्या नेतृत्वात टीम इंडियाने मँचेस्टरमध्ये झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा माज उतरवला आहे. टीम इंडियाने दुसऱ्या डावात ३११ धावांची आघाडी मोडीत काढून इंग्लंडला विजय मिळवण्यापासून यशस्वीरित्या रोखलंय. भारताने कर्णधार शुबमन गिल, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर या तिघांच्या शतकी खेळीच्या जोरावर दुसऱ्या डावात ४ विकेट्स गमावून ४२५ धावा केल्या. त्यानंतर सामना अनिर्णित असल्याचं जाहीर करण्यात आलं. या सामन्यानंतरही इंग्लंड या मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. तर पाचवा आणि अंतिम सामना हा ३१ जुलैपासून लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे खेळवण्यात येणार आहे.

# नांदेड जिल्ह्यात १७ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी; २४ तासांत ३०.७० मिलिमीटर पावसाची नोंद



**अतिवृष्टी झालेली महसूल मंडळे**

नांदेड शहर -७७.२५, नांदेड ग्रामीण -७९.५०, तुप्पा -८१.२५, वसरणी -८१.२५, विष्णुपुरी -७९.५०, लिंबगाव -८४.२५, तरोडा -८८.००, वाजेगाव -८१.२५, नाळेश्वर -८२.००, कापसी -८१.२५, भोकर -६६.७५, मोंघाळी -६६.५०, मुदखेड -८८.२५, मुगट -८८.२५, बारड -८१.५०, दाभड-७९.५०, मालेगाव -७३.२५.

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात गेल्या २४ तासांमध्ये सरासरी ३९.७० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यामुळे जिल्ह्यातील १७ महसूल मंडळांमध्ये ६५ मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. काही भागांत ८८.२५ मिमीपर्यंत अतिवृष्टी झाली आहे. जिल्ह्यात एकूण ९३ महसूल मंडळांपैकी ही १७ मंडळे अतिवृष्टीग्रस्त ठरली आहेत.

सर्वाधिक पावसाची नोंद मुदखेड तालुक्यातील मुदखेड व मुगट या मंडळांमध्ये प्रत्येकी ८८.२५ मिमी झाली. त्याचप्रमाणे लिंबगाव (८४.२५ मिमी), बारड (८१.५० मिमी), तुप्पा, वसरणी, तरोडा, वजेगाव, नांदेड ग्रामीण व कापसी या मंडळांमध्येही ८१.२५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

या अतिवृष्टीमुळे काही भागात शेती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने संबंधित विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. पावसाच्या पुढील स्थितीवर प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे.

## रेल्वेतील निकृष्ट जेवणाच्या ६ हजार ६४५ तक्रारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय रेल्वेतील जेवणाच्या निकृष्ट दर्जाबद्दल २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६ हजार ६४५ तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती खुद्द रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव पांनी राज्यसभेत दिली. प्रवाशांच्या वाढत्या तक्रारींमुळे रेल्वतील खानपान सेवेच्या गुणवत्तेवर गोठे प्रश्नचिन्ह निमांग झाल आहे. राज्यसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना रेल्वेमंत्र्यांनी ही आकडेवारी सादर केली. खासदार जॉन विटास यांनी रेल्वेतील जेवणाचा दर्जा व कंत्राट वाटपातील पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले होते.

## हरिद्वारच्या मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी; ६ जणांचा मृत्यू

**हरिद्वार (प्रतिनिधी)–** हरिद्वारमधील मनसा देवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांवर रविवारी सकाळी ही चेंगराचेंगरीची घटना घडली. या दुर्घटनेत अनेक जण जखमी झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यादरम्यान गढवाल डिव्हीजनचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी वृत्तसंस्था एएनआयला या घटनेबद्दल माहिती दिली आहे.

हरिद्वारच्या मनसा देवी मंदिरात प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मी घटनास्थळाकडे जात आहे. या घटनेच्या सविस्तर अहवालाची प्रतिक्षा आहे, असे गढवाल डिव्हिजनचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी सांगितले.

आयजी कायदा आणि सुव्यवस्था, निलेश भारणे यांनी सांगितले की, भाविक मंदिराकडे जात असताना ही घटना रविवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. तेथे विजेचा धोका असल्याबद्दल अफवा पसरली, त्यामुळे भाविकांमध्ये भीती पसरली आणि ही परिस्थिती उद्भवली. आम्ही कारणांचा तपास करत आहोत आणि बचावकार्य सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

अनेक जखमी भाविकांना रुग्णालयात दाखल केले जात असल्याचे व्हिडीओ देखील समोर आले आहेत. मनसा देवी मंदिर हे हरिद्वारच्या पाच पवित्र स्थळांपैकी एक मानले जाते पंच तीर्थांपैकी एक म्हणून येथे अनेक भाविक दर्शनासाठी येतात. हे मंदिर शिवालिक हिल्स येथे ५०० फूटांपेक्षा जास्त उंचीवर आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी चेंगराचेंगरीनंतर सोशल मीडियावर केलेल्या पोस्टच्या माध्यमातून दुःख व्यक्त केले आहे.

## महाराष्ट्रातील सात, देशातील १७ खासदार संसदरत्न पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** प्राईम फाउंडेशनच्यावतीने लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्यांना त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कामगिरीसाठी दिला जाणारा संसदरत्न पुरस्कार सोहळा राजधानी दिल्लीत केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत पार पडला. देशातील १७ खासदार आणि दोन संसदीय स्थायी समित्यांना हा पुरस्कार दिला गेला. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचाही समावेश आहे.

संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये महाराष्ट्रातील खासदार स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना), नरेश म्हस्के (शिवसेना), अरविंद सावंत (शिवसेना ठाकरे गट) आणि वर्षा गायकवाड (काँग्रेस) या सात खासदारांचा संसदेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे.

याशिवाय देशातील भर्तृहरी महताब (भाजप, ओडिशा), एन.के. प्रेमचंद्रन (आरएसपी, केरळ), भाजप खासदार प्रवीण पटेल, भाजप खासदार रवी किशन, भाजप खासदार डॉ. निशिकांत दुबे, भाजप खासदार बिद्युत बरन महतो, भाजप खासदार पी.पी. चौधरी, भाजप खासदार मदन राठोड, डीएमके खासदार सी.एन. अण्णादुराई आणि भाजप खासदार दिलीप सैकिया यांचाही यात समावेश आहे.

राज्यनिहाय पाहिल्यास यावर्षी महाराष्ट्रातील ७ खासदारांना पुरस्कार मिळाले आहेत. तसेच उत्तर प्रदेश, झारखंड आणि राजस्थानला प्रत्येकी २, ओडिशा, तामिळनाडू, केरळ आणि आसाम राज्यातील प्रत्येकी एका खासदाराला संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. संसदेत सादर केलेल्या अहवालांच्या आधारे स्थायी समित्यांची निवड करण्यात आली आहे. अर्थविषयक स्थायी समिती, अध्यक्ष भर्तृहरी महताब (भाजपा, ओडिशा) आणि कृषीविषयक स्थायी समिती, अध्यक्ष डॉ. चरणजित सिंग चन्नी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पंजाब) यांचाही यात समावेश आहे.

# वज्रमुठ राज्यव्यापी बैठकीत रोष, मराठा कार्यकर्त्यांवरील अन्यायाचा करण्यात आला निषेध




**नांदेड (प्रतिनिधी)–** वज्रमुठ राज्यव्यापी बैठक सांगवी येथे तीव्र रोषाच्या वातावरणात दि. २७ जुलै रोजी पार पडली. विविध मराठा संघटना, शेतकरी नेते, आणि पुरोगामी विचारधारेचे कार्यकर्ते एकत्र येत सरकारविरोधात कठोर भूमिका मांडताना दिसले. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, मराठा समाजावर झालेल्या अन्यायाला 'जशास तसे' चोख प्रत्युत्तर देण्याचा इशारा देण्यात आला.

पुरोगामी कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याला उपस्थितांनी मराठा समाजावरील थेट हल्ला मानले. हा हल्ला म्हणजे मराठ्यांनी दबून रहावे असा इशारा देणारा असल्याचे सांगत निषेध व्यक्त करण्यात आला.

संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या, जरांगे पाटलांच्या आंदोलनावरील लाठीमार, इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना शिवीगाळ आणि छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचा अवमान या सर्व घटनांचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. याच बैठकीत, राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून विजयकुमार घाडगे पाटलांवर झालेल्या मारहाणीवरूनही संताप व्यक्त करण्यात आला. बैठकीत सांगितलं की, उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना लगाम घालावा, नाहीतर परिणाम भोगावे लागतील. छावा संघटनेचे कार्यकर्ते खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेवेळी केलेल्या शांततापूर्ण प्रतीकात्मक आंदोलनानंतर त्यांच्यावर झालेली मारहाण लोकशाहीविरोधी असल्याचा ठपका बैठकीतून ठेवण्यात आला.

मराठा तरुणांच्या आवाजावर गदा आणणाऱ्या घटनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, कृषीमंत्री सभागृहात रमी खेळू शकतात, पण गरीब तरुण आवाज उठवतो तेव्हा त्याला मारहाण होते. ही कोणती मर्दानगी? असा सवाल उपस्थित केला गेला. याचं वेळी काही मागण्या करण्यात आल्या ज्यामध्ये प्रामुख्याने कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, हल्लेखोरांवर कठोर कारवाई, मराठा समाजावरील होत असलेला अन्याय थांबवणे आदी होत्या. यावेळी तीस पेक्षा जास्त अधिक संघटनेचे पदाधिकारी व महिला यावेळी उपस्थित होत्या.

दरम्यान ही लढाई शेवटपर्यंत लढली जाईल, आणि अन्याय थांबल्याशिवाय थांबवली जाणार नाही, असा ठाम निर्धार या बैठकीतून व्यक्त झाला.

# पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा; एकनाथ खडसेंच्या जावयास अटक

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील उच्चभ्रू खराडी भागात रेव्ह पार्टी सुरू होती. येथे पोलिसांनी छापा टाकूला असून या पार्टीतून एकनारथ खडसे यांच्या जावयास अटक करण्यात आली आहे.

खराडी भागातील एका फ्लॅटमध्ये हाउस पार्टीच्या नावाखाली रेव्ह पार्टी सुरू होती. या पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ, दारू, हुक्काचे सेवन सुरू होते. रेव्ह पार्टी करणाऱ्यांमध्ये २ महिला आणि ४ पुरुषांचा समावेश आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने टाकलेल्या छापेमारीमध्ये अमली पदार्थ, हुक्का, दारू जप्त करण्यात आली आहे. यामध्ये एकनाथ खडसेंचा जावई प्रांजल खेवलकर सहभागी होता. या रेव्ह पार्टीत सहभागी असलेल्या सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, यामध्ये दोन महिला आणि चार पुरुषांचा समावेश आहे. यातील काही जण उच्चभ्रू वर्गातील असल्याची माहिती आहे.





# देशातील बड्या कंपनीत नोकरकपात, १२ हजार कर्मचाऱ्यांना मिळणार नारळ?

**मुंबई (प्रतिनिधी)–** टाटा समूहाची आघाडीची आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने एक निर्णय घेतला आहे. ज्याचा परिणाम येत्या काही महिन्यात हजारो कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर (गेल) होऊ शकतो. कंपनीने स्पष्ट केले आहे की ती २०२६ या आर्थिक वर्षात (एप्रिल २०२५ ते मार्च २०२६) त्यांच्या जागतिक कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २ टक्के कपात करणार आहे. याचा थेट परिणाम १२००० हून अधिक कर्मचाऱ्यांवर होईल.

सध्या कंपनीत सुमारे ६.१३ लाख कर्मचारी काम करत आहेत. त्यानुसार, सुमारे १२ हजार २०० लोकांना कपातीचा फटका बसू शकतो. ही कपात टीसीएसच्या सर्व देशांना आणि कार्यक्षेत्रांना प्रभावित करेल, जिथे कंपनी काम करत आहे.

टीसीएसचे सीईओ के. कृतिवासन यांनी एका मुलाखतीत सांगितले की, आपण नवीन तंत्रज्ञानाकडे, विशेषतः एआय आणि ऑपरेटिंग मॉडेलमध्ये बदलांकडे वाटचाल करत आहोत. यामुळे काम करण्याची पद्धत बदलत आहे आणि आपल्याला स्वतःला अधिक चपळ आणि भविष्यासाठी तयार बनवावे लागेल. त्यांनी हे देखील मान्य केले की कंपनीने कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्याचा आणि त्यांना पुन्हा नियुक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतू, काही भूमिका अशा होत्या जिथे हे शक्य नव्हते. म्हणून, ही टाळेबंदी आवश्यक झाली. त्यांच्या मते, हा निर्णय प्रामुख्याने मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांवर परिणाम करेल. सीईओंनी याला माझ्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात कठीण निर्णय म्हटले आहे.

टीसीएसने म्हटले आहे की, ते प्रभावित कर्मचाऱ्यांना नोटिस कालावधी वेतन तसेच अतिरिक्त विच्छेदन पॅकेज, आरोग्य विमा आणि आउटप्लेसमेंट सहाय्य प्रदान करेल. टाळेबंदीचे कारण एआय नाही तर पुनर्कौशल्य आणि तैनातीतील मर्यादा आहेत. कंपनी म्हणते की ते त्यांच्या कर्मचाऱ्यांना नवीन काळातील कौशल्ये शिकवण्यासाठी सतत गुंतवणूक करत आहेत. परंतु सर्व भूमिका नवीन योजनेत बसत नाहीत.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# वृद्धत्व ही संधी आहे....

मॉडेल आणि अभिनेत्री शेफाली जरिवालाची वयाच्या केवळ ४२ व्या वर्षी झालेला मृत्यू, एक काळजात घर करणारी घटना आहे. तिला आयुष्याचं पुन्हा एक पर्व सुरू करायचं होतं, पण तिच्या अकाली मृत्यूमुळे एक वेगळाच प्रश्न समोर आला. आपण खरंच वयाप्रमाणे जगण्याला घाबरतो आहोत का? आजच्या तरुण पिढीला वृद्धत्वाचा विचारसुद्धा का अस्वस्थ करतो? माहितीनुसार, शेफालीने अँटी-एजिंग औषधे, त्वचा उजळवणाऱ्या गोळ्या व विविध प्रकारचे सप्लिमेंट्स वापरले होते. तिचा मृत्यू याच गोळ्यांमुळे झाला का, हे निश्चित सांगता येणार नाही. पण ही घटना आपल्याला अंतर्मुख करणारी आहे. तरुण दिसणं म्हणजे यशाचं लक्षण आणि वृद्धत्व म्हणजे अपयशाचं? ही कल्पनाच आपल्या समाजात खोलवर रुजली आहे. वय वाढणं ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. चेहऱ्यावर सुरकुत्या येणं, केस पांढरे होणं किंवा शरीराचा उत्साह कमी होणं, हे सगळं अपरिहार्य आहे. पण आजची सोशल मीडियावर आधारित संस्कृती हे सगळं नाकारते. तरुणपणचं अतिरेकी उदात्तीकरण आणि 'परफेक्ट' दिसण्याचा दबाव यातूनच तरुणाईला 'तरुण' राहण्याचं एक वेड लागलं आहे. आज इंस्टाग्राम, टिकटॉक, स्नॅपचॅट यांसारख्या माध्यमांवर तरुण आणि सुंदर दिसणारे इन्फ्लुएन्सर्स हे सौंदर्याचे निकष ठरवतात. पण त्यांच्या सौंदर्याचं खरं गुपित म्हणजे महागडी कॉस्मेटिक प्रक्रिया, फिलर्स, सर्जरी आणि रासायनिक उत्पादने. ही सर्व कृत्रिमता पुढे गंभीर आरोग्यधोके निर्माण करू शकते, तरीही आजची तरुणाई यासाठी आकर्षित होते. आज २० वर्षांची मुलंही बोटॉक्स सारखी अँटी-एजिंग उपचार घेण्यास तयार असतात. हे केवळ सौंदर्याच्या नजरेतून नव्हे, तर सामाजिक मान्यता टिकवण्यासाठी होत आहे. लोक आपल्या शरीराच्या बदलांपेक्षा आउटडेटेड वाटण्याला अधिक घाबरतात. पूर्वी वय वाढल्यावर आपोआप समाजात एक आदर मिळायचा. आज तसं होत नाही. उलट, वय वाढल्यावर तुम्ही ट्रेंडमध्ये नसलेले, टेक्नॉलॉजीपासून दूर किंवा स्वतःची जागा हरवलेले ठरता. सोशल मीडियाच्या अल्गोरिदम्ससुद्धा तरुणांकडे झुकतात. त्यामुळे ३० च्या पुढचे लोकदेखील स्वतःला आउट समजू लागतात. या काळात 'तरुण' राहणं ही केवळ आरोग्याची किंवा सौंदर्याची गरज राहिली नाही तर ती आता आर्थिक, सामाजिक आणि मानसिक स्थैर्याची प्राथमिक अट बनली आहे. २५-३० वयात 'स्टार्टअप फाउंडर', 'इन्फ्लुएंसर', 'ऑथर' बनणाऱ्यांच्या गोष्टी जेव्हा सगळीकडे झळकतात, तेव्हा सामान्य तरुणही स्वतःला कमी लेखतो. त्याला वाटतं आपण उशीर केला, आपल्याकडून काही होणार नाही, आणि त्यामुळं वृद्धत्व त्याला अपयशासारखं वाटू लागतं. याशिवाय, विवाह, पालकत्व, घर घेणं यासारखी पारंपरिक आयुष्याची टप्पे आता अनेकांच्या आयुष्यात येतच नाहीत. कधीकधी आर्थिक परिस्थितीमुळे, कधीकधी इच्छेने. त्यामुळे भविष्यात काय असेल याचा काहीच अंदाज राहत नाही. वृद्धत्व म्हणजे केवळ वय वाढणं नव्हे, तर दिशाहीनतेची एक पायरी वाटू लागते. पूर्वी धर्म, कुटुंब, समाज अशा आधारांमुळे वृद्धत्वाच्या चिंतेला सांत्वन मिळायचं. आजच्या तरुणांकडे हे आधार कमी आहेत. ते त्यांच्या अस्वस्थतेला वाट करून देत नाहीत. त्यामुळे वाढणारं वय त्यांच्यासाठी भीती बनतं केवळ शरीराचं नव्हे, तर अस्तित्वाचं संकट वाटायला लागतं. या सगळ्यांतून सुटका आहे का? होय, आहे. मनाचा विकास, सामाजिक नाती आणि आध्यात्मिक समतोल यातून वृद्धत्वाचा स्वीकार सुखकर होऊ शकतो. सतत तरुण दिसण्याचा आटापिटा करण्यापेक्षा शरीर, मन आणि आत्मा यांचं आरोग्य जपणं अधिक महत्त्वाचं आहे. योग, ध्यान, संतुलित आहार, वेळेवर झोप, व्यसनांपासून दूर राहणं आणि आपलं कर्तव्य पार पाडणं, या गोष्टी आपल्याला खरी ऊर्जा देतात. वृद्धत्त्व हे क्षीण होण्याचं नव्हे, तर समृद्ध होण्याचा टप्पा आहे. त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवं. आपण जर समाजात संवाद उभा केला, तरुण आणि वृद्धांमध्ये सहानुभूती वाढवली, आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणाला स्वीकारण्याची तयारी ठेवली तर आपण वयाकडून पळणार नाही, तर त्याचं स्वागत करू. सौंदर्याचं खरं मोल चेहऱ्याच्या तेजात नाही, तर आत्म्याच्या संतुलनात असतं. औषधी, गोळ्या कधीच ती शांती देऊ शकत नाहीत. ही शांती फक्त समाधानी मनातच असते. म्हणूनच वृद्धत्व ही संधी आहे, निवृत्तीची नव्हे, नव्या प्रवासाची.

# जय जय महाराष्ट्र माझा...

महाराष्ट्र ही संतांची, छत्रपती शिवरायांची, जिजाबाई, अहिल्याबाई, सावित्रीबाई, ताराबाई यांची तसे महान सुधारकांची परंपरा असलेली पवित्र भूमी आहे. इथे कला, संस्कृती व साहित्य यांचा गौरव होतो. मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय आमचा एक महाराष्ट्र देश हा, असे आपण अभिमानाने म्हणतो. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा म्हणून महाराष्ट्राचा जयजयकार करतो.पण...

गेल्या काही वर्षात या महाराष्ट्रात राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली आहे. राजकीय समीकरणे पार बदलून गेली. सत्तेच्या राजकारणामुळे तत्व धुळीला मिळाले आहेत. काल काय बोललो होतो आणि आज काय करत आहोत याचे भान नष्ट होत चालले आहे. बोलण्यात, कृतीत ताळमेळ नाही. बेताल आणि पातळी सोडून वागणे, बोलणे होत आहे. मग प्रश्न पडतो की, आपण वर्णन करतो यातला महाराष्ट्र हरवत चालला आहे काय?

गेल्या वर्षीचे मनोज जरांगे पाटलांचे आरक्षण आंदोलनाने सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. महाराष्ट्रभर त्याचे पडसाद उमटले. संपत्तीचे नुकसान झाले. अनेकांबद्दल पातळी सोडून बोलले गेले. त्यानंतर बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांचे निर्घृण हत्या प्रकरण. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता आणि संताप व्यक्त केला गेला. हळहळ व्यक्त झाली. हे प्रकरण मागे पडत नाही तो पुण्यामध्ये वैशाली हगवणे हत्या आत्महत्या प्रकरण उघडकीला आले. ह्या प्रकारांवर फार मोठ्या प्रमाणावर समाज माध्यमातून चर्चा झाली आणि त्यातूनही परत अनेक गोष्टी समोर आल्या. या प्रकरणांमध्ये राजकीय पाठबळ असल्याचेही बराच वेळा दाखवून दिले गेले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड आणि त्यासोबतच राजकीय वरदहस्त म्हणून धनंजय मुंडे यांचे नाव पुढे आले. त्यांना काही काळाने का होईना त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरले. त्यातून ते कृषिमंत्री असताना फायदा घेऊन धनंजय मुंडे यांनी वेळोवेळी कसा भ्रष्टाचार केला हेही समोर आले. तर वर्तमानपत्रातून तो जनतेसमोर आणला गेला. धनंजय मुंडे कृषी मंत्री असताना अगदी बदली करायचे रेट कसे कसे होते वर्तमानपत्रात चार्टसहित प्रसिद्ध झाले आहे. ही बाब तर दुर्लक्षितच राहिली. त्याच्यावर मात्र काही चर्चा नाही. तरीही आता ते म्हणत आहेत,



माझ्या बीडच्या मातीला बदनाम करू नका.

निवडणुकीच्या आधी आश्वासन देणे हे तर राजकीय नेत्यांचे कामच आहे. ज्याप्रमाणे आताही शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी किंवा सातबारा उतारा कोरा करणे, विमा रकमा ताबडतोब मिळाल्याविषयी आश्वासन झाले, लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये, शेतकऱ्यांना मानधन योजना, हे सर्व जर बघितले तर आता काही काळ लोटल्यानंतर ह्या आश्वासनाची किती पूर्तता झाली याविषयी लोकांमध्ये आता चुळबूळ सुरू झाली आहे. निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणीला सरसकट कुठलेही निकष न लावता येतील ते अर्ज मंजूर करून दिले गेले. परंतु आता त्याची मात्र छाननी सुरू झाली आणि आता त्यात सुधारणा करण्यात आली.वेगवेगळे निकष लावले जात आहेत. कर्जमाफीचेही तसेच झाले. त्यासाठी पुन्हा एकदा महाराष्ट्र ढवळून निघाला. बच्चू कडूंचे आंदोलन सुरू झाले आणि आता माफी घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असा त्यांनी चंगच बांधला. आता अधिवेशनात कर्जमाफी विषयी परत एकदा नवीन निकष लावून त्याचा निर्णय होईल, त्यालाही आता बराच कालावधी लागणार आहे. त्याच्याविषयी अजून स्पष्टपणे धोरण जाहीर होईल तेव्हा समजेल. फक्त गरीब शेतकऱ्यांनाच शेती कर्जमाफीचा फायदा मिळावा म्हणून काही निकष लावून माफी दिली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पण ज्यांनी कर्जफेड वेळेवर केली आहे त्यांना काय प्रोत्साहन दिल्या जाणार त्या बाबतीत कुठलाही निर्णय जाहीर झाला नाही.आम्ही वेळेवर पैसे भरतोही, चूक करतो का? असाही प्रश्न विचारला जातोय.

नुकतेच अधिवेशन पार पडले. अधिवेशनामध्ये जनतेच्या असंख्य प्रकारच्या विषयी चर्चा होणे आवश्यक असते. परंतु अधिवेशन काळात अनेक गोष्टी अशा घडतात की, महत्त्वाचे मुद्दे बाजूला राहतात आणि नाही त्या गोष्टीवर फोकस केला जातो अधिवेशन काळातही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे मोबाईलवर रमी खेळण्याविषयीचे वृत्त आणि व्हीडीओ प्रसिद्ध झाला. त्यामुळे परत एकदा हे अधिवेशनात आपले आमदार आणि मंत्री किती गंभीरपणे बघतात हे एकदा समोर आले. जनतेच्या प्रश्नाकडे किती गंभीरपणे या चर्चेत ते सहभागी होतात हे दिसून आले. त्याच काळात गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड या दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनात तुंबळ झाले. चित्रपट स्टाईल हाणामारी झाली. वास्तविक पाहता अधिवेशन काळात अशावेळी बाहेरच्या व्यक्तीला प्रवेश नको असे असताना सुद्धा बाहेरची व्यक्ती आतमध्ये प्रवेश करतात आणि ही परिस्थिती उद्भवते ही अतिशय गंभीर बाब आहे. पक्ष कोणताही असो, परंतु त्यासाठी नियमावली ही एकच पाहिजे. अधिवेशन काळात कृषिमंत्री मोबाईल बघत होते. त्या संदर्भात परत एकदा लातूरमध्ये कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. लातूरमध्ये सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद सुरू असताना छावा संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी कृषी मंत्राच्या राजीनाम्याचे निवेदन देण्याविषयीचे गोष्टीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि छावा संघटना यातही हाणामारी झाली. अनिल परब यांनी मंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने बार असल्याचे उघड केले. हनीट्रॅप प्रकरण गाजते आहे. म्हणजे महत्त्वाचे प्रश्न बाजूला राहतात आणि राजकीय नेत्यांच्या मंत्र्यांच्या या प्रकरणांमध्ये जास्त लक्ष घालावे लागते. अधिवेशनाचा अधिक वेळ खर्च होतो. अर्थात राजकीय नेते बराच वेळा कार्यकर्त्यांना अभय देत असल्यामुळे अशा गोष्टी घडतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अधिवेशनात चर्चा बरोबरच पोलखोल प्रकरणे वाढत असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोगाचे आकडेवारीनुसार विधानसभेत २८६ आमदारांपैकी ११८ आमदारांवर गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल आहेत. राजकारणात गुन्हेगारीकरण गंभीर बाब आहे. राज्यात एकूण १०८००० जिल्हा परिषद मराठी शाळा असून अनेक शाळांमध्ये पटसंख्या ही २० पेक्षाही कमी आहे, अशा अठरा हजार मराठी शाळा विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे बंद होणार असलेली माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. एकीकडे आपण मराठी शाळांविषयी, मराठी भाषेविषयी आग्रही असताना या शाळा बंद होणे तितकेच धोक्याचे आहे. त्याशाळा बंद होवू नये यासाठी प्रयत्न हवे. अशा परिस्थितीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा कल वाढणार नाही तर नवलच. अशा शाळांमध्ये लाखाने फी आणि डोनेशन घेतले जाते. त्याविषयी पालकांमध्ये असंतोष आहे. त्या शाळांवर काहीच बंधन नाही का? अशा खाजगी शाळावर काही बंधन, निमम घालणार का नाही? काही शिक्षण संस्थांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या संख्येत तफावत आढळली तर संस्थेने आपल्या बांधकामामध्ये कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवल्याचे उघड झाले आहे. बनावट कागदपत्रे, प्रवेश, शिक्के बनवून कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली, त्याचीही चौकशी मागणी अधिवेशनात केली आहे.

स्त्रियांवरील अत्याचार हा तर नेहमीचाच विषय आहे. स्त्रिया-मुली गायब होणे तसेच जबरदस्तीतून धर्मांतर करायला लावायचे घटना समोर येत आहे. याच्यावरही काहीतरी ठोस उपाय करणे आवश्यक असताना तिकडेही दुर्लक्ष होत आहे. शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये कॅमेरा लावून त्याचे चित्रीकरण करायची घटना मध्यंतरी घडल्या होत्या तर नुकतेच एका शाळेमध्ये मुलींच्या मासिक पाळीच्या विषयावरून मुलींना विवस्त्र करून पाळीची तपासणी केली. अशा अप्रिय घटना असंतोषाला कारणीभूत ठरणाऱ्या घटना घडत आहेत. महिला आयोगानेही ह्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

त्रिभाषा वाद अजून मिटला नाही. त्यासाठी वेळोवेळी आंदोलनाचा पवित्रा घेतला जात आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता, अधिवेशन काळात विधिमंडळ सभागृहात प्रवेशासाठी कडक धोरण अवलंबिले जावे. अधिवेशनात असंस्कृत, असंसदीय शब्दांचा वापर होवू नये. पातळी सोडून बोलू नये. केवळ आरोपप्रत्यारोपात अधिवेशनाचा वेळ वाया घालवू नये.जनतेच्या प्रश्नावर, शेतकरी समस्या, बेरोजगारी, सरकारी योजनावर चर्चा होणे अपेक्षित आहे.

मोबाईल रमी प्रकरण चर्चा बघता अधिवेशन काळात सभागृहात मोबाईल वापरायला बंदी घालावी.आपण जनतेच्या भल्यासाठी ईथे आलेलो आहोत, याच भान ठेवायला हवे. कारण या अधिवेशनावर शासनाचा,अर्थात जनतेचाच कोट्यावधी चा निधी, पैसा खर्च होत असतो. त्यातून काही निष्पन्न व्हायला हवे. जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणत आहे की, एकूणच घडणाऱ्या घटनावरुन,वागणूकीतून आमदारांना माज आलाय ही भावना कुठेतरी जनतेमध्ये निर्माण होत आहे का? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करुन सर्वांनाच वागणूक व्यवस्थित ठेवण्यासाठी जाणीव करून दिली हे तितकेच महत्त्वाचे आहे.

अधिवेशनात पातळी सोडून बोलण, वागणे, आरोपप्रत्यारोप, प्रकरणांमधली पोलखोल हेच बघयला मिळते. कुठेतरी ह्याचा विचार करायची वेळ आली आहे. त्यावर चिंतन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या महान परंपरेची आब राखा म्हणायची वेळ आली आहे.

**-दिलीप देशपांडे**
जामनेर, जि.जळगांव.
मो. ८९९९५६६९१७


# म्हाडाने १५ कोटी दस्तऐवज केले ऑनलाईन सार्वजनिक




**मुंबई :** महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाने (MHD) पारदर्शक प्रशासन दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यांनी १५ कोटी अधिकृत दस्तऐवज त्यांच्या अधिकृत वेबसाइट https://mhada.gov.in द्वारे सार्वजनिक पाहण्यासाठी उपलब्ध केले आहेत.

लॉटरी प्रक्रियेशी संबंधित संवेदनशील किंवा गोपनीय नोंदी सार्वजनिक प्रवेशातून वगळण्यात आल्या आहेत, असे गृहनिर्माण मंडळाने शनिवारी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. नागरिक म्हाडाच्या वेबसाइटवरील सिटीझन कॉर्नर विभागातून या नोंदी पाहू शकतात. यासाठी नोंदणी आवश्यक आहे, ज्यात नाव, मोबाईल नंबर, लिंग, जन्मतारीख, वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड यासारख्या तपशिलांचा समावेश आहे, तसेच प्लॅटफॉर्मच्या अटी व शर्तींना सहमती दर्शवणे अनिवार्य आहे. आधार किंवा पॅनसह ओटीपी पडताळणीद्वारे ओळख पडताळणी करणे बंधनकारक आहे. एकदा पडताळणी झाल्यावर, नागरिक विविध विभागांतील अधिकृत दस्तऐवज पाहू शकतील. डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, दस्तऐवज डाउनलोड करण्यास किंवा स्क्रीनशॉट घेण्यास परवानगी नाही. वापरकर्त्यांनी दस्तऐवज पाहताना कारण देखील देणे आवश्यक आहे, आणि सर्व प्रवेश क्रियाकलाप प्रशासकीय संदर्भासाठी नोंदवले जातात आणि संग्रहित केले जातात.

# अभ्यासू व्यक्तीमत्त्व-सीए. डॉ. प्रवीण सदाशिव पाटील



आयुष्यातून जेंव्हा महत्त्वाचे क्षण निघून जातात तेंव्हा जर तर शिल्लक राहतात याची जाण असणारे विचारवंत सीए. डॉ. प्रवीण पाटील यांनी आपल्या आयुष्याचं सोनं केलं. श्रमाच्या घामाची फुले झालीत. साधू-संतांच्या पवित्र पावन चांगदेव मूळ गावचे प्रवीण सदाशिव पाटील यांचा भुसावळ तालुक्यातील किनी गावी दि. २८ जुलै १९६२ रोजी जन्म झाला.

शिक्षणाचा ध्यास असणाऱ्या प्रवीण पाटील यांनी पुण्यातून सी. ए. परीक्षा तसेच बी.कॉम., एल.एल.बी.एफ.सी.ए., डी.आय.एस.जी., डी. आय.एस.ए.जी.डी. सी. अँड ए. अशा उच्च पदव्या संपादन केल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सीए. मध्ये डॉक्टरेट पदवी प्रदान केली. वडील टॅक्स सल्लागार म्हणून समाजसेवेत कार्यरत होते असे ज्येष्ठ विचारवंत कै. सदाशिव पाटील शेतकरी कुटुंबातील असूनसुध्दा आश्रयाने शिक्षण घ्यावे लागलं. समाजवादी विचारधारणाचे असल्यामुळे आणीबाणीच्या वेळेस त्यांना कारावास भोगावा लागला. मनुष्य निर्भयपणे एखाद्या उंच शिडीवर चढू लागला तर तो वाटेल तितका उंच चढू शकतो. हे कै. सदाशिव पाटील यांनी सिद्ध केले होते. संसारातील उन-सावल्यांच्या सप्तरंगात रंगलेल्या पत्नी सौ. प्रांजली पाटील पण शिक्षण क्षेत्रात एम.एस्सी., बी. एड् (फिजीक्स, इलेक्ट्रॉनिक्स) सुवर्ण पदक संपादन केले आहेत.

शिक्षण परायण कन्या वैभवशाली शैक्षणिक परंपरेला जोपासणारी सौ. सायलीने सी.ए.ची परीक्षा गुणानुक्रमांकाने उतीर्ण केली. तसेच आयआयएम शिक्षण प्राप्त केले. चि. प्रतिक पाटील यांनी सुध्दा वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सीए पदवी प्राप्त केली व आज मुंबई येथील मोठ्या कंपनीमध्ये कार्यरत आहेत. ज्ञान व प्रयत्नांना कधीही सीमा नसतात. तसेच उंच भरारी घेणाऱ्याला आकाशाचं भय नसते. सौ. सायलीच्या यशाचे हेच सुत्र आहे. निरक्षीर विवेकबुध्दी प्रवीण पाटील यांच्या अंगी असल्यामुळे त्यांनी जीवनातील सुख आर्थिक स्थितीवर नव्हे तर उच्च विचारांवर अवलंबून असते हे मनामध्ये रुजवले. धर्मनिरपेक्ष भावनेने सामाजिक पद खालील नैतिक जबाबदारी पार पाडल्या व नैतिक मूल्ये जोपासल्या. उपाध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी- अध्यक्ष, एन.इ.एस.पीपल्स कॉलेज, माजी विद्यार्थी संघटना, नांदेड, माजी अध्यक्ष नांदेड चार्टर्ड अकौंटंटस असोसिएशन, माजी अध्यक्ष, टॅक्स प्रॅक्टीशनर्स असोसिएशन, नांदेड, माजी अध्यक्ष रोटरी क्लब नांदेड, संस्थापक भाग्य युवा मंडळ, भाग्यनगर नांदेड, कोषाध्यक्ष, श्री सिध्दी विनायक मंदिर, भाग्यनगर नांदेड, सदस्य पीपल्स कॉलेज माजी विद्यार्थी संघ स्नेहनगर, नांदेड, सदस्य-परिवर्तन प्रतिष्ठा, नांदेड, माजी सदस्य वेस्टर्न रिजनल कौन्सील कमीटी, मुंबई, माजी स्वीकृत सदस्य महाराष्ट्र राज्य विक्रीकर सल्लागार संघटना व्यवस्थापन समिती, मुंबई.

कै. नरहर कुरुंदकर यांचे हस्ते उद्घाटन झालेले भाग्यनगर राष्ट्रसेवा दलाच्या शाखेत १२५ मुले, मुली येत असत. ती शाखा घेत असलेले प्रवीण पाटील या राष्ट्रसेवेच्या कार्याने भारावून जात असत. तसेच साने गुरुजी, मधु दंडवते, ग. प्र. प्रधान, मृणालताई गोरे व एस. एम. जोशी यांच्या विचाराने प्रभावित होते.

ज्ञान हे पैशापेक्षा श्रेष्ठ आहे, पैशाचे रक्षण तुम्हाला करावे लागते, पण ज्ञान तुमचे रक्षण करते. जिवेत् शरदः शतम्।। माँ तुळजाभवानी प्रार्थना, प्रवीण पाटील यांना उदंड आयुष्य लाभो!

**-प्रा. डॉ. किरण शिल्लेवार**
सायन्स कॉलेज, नांदेड

# समाजसेवेचे समर्पित व्यक्तिमत्त्व भानुदास परशुराम यादव



१५ मे १९४५ रोजी जन्मलेले भानुदास परशुराम यादव हे नांदेड जिल्ह्यातील गवळी समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक जागृतीचे एक जिवंत प्रतीक होत. त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद मल्टीपर्पज हायस्कूल नांदेड येथे पूर्ण केले आणि त्यानंतर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून बी.ए. पदवी संपादन केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लगेचच त्यांना मृद संधारण विभागात अनुरेखक पदाची सरकारी नियुक्ती मिळाली. नोकरीच्या बंधनात असूनही त्यांनी समाजकार्याची मशाल कधीच खाली ठेवली नाही. शासनाच्या सेवेत असताना देखील सामाजिक ऋण फेडण्यासाठी झपाटून कार्य करणे हे त्यांच्या आयुष्याचे खरे ध्येय होते, आणि म्हणूनच त्यांनी त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण समाजहितासाठी झिजवला. स्वातंत्र्यसैनिक बालाराम यादव (काका) यांचा त्यांच्यावर अत्याधिक प्रभाव होता. स्वातंत्र्यसंग्रामातील त्याग, निःस्वार्थ वृत्ती राष्ट्रसेवेचे संस्कार आणि स्वावलंबन भानुदास यांच्या जीवनधारेत मिसळले गेले होते ते त्यांच्या काकांमुळे.

वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी त्यांनी समाजसुधारणेचा वसा घेतला आणि यादव अहीर मंडळाच्या माध्यमातून परिसरातील गरीब, होतकरू जवळपास १०० मुलां मुलींना शिक्षित करण्याचे काम केले. पुढे त्यांनी बिशनकुमार यादव यांच्या अध्यक्षतेखाली कर्मवीर साहेबराव बारडकर प्राथमिक विद्यालयाची स्थापना केली आणि त्या संस्थेचे सचिव म्हणून आयुष्यभर कार्यरत राहिले. हिंदी, इंग्रजी, मराठी सोबतच त्यांना संस्कृत आणि उर्दू भाषचे ज्ञान होते. शिक्षणाच्या जोडीने समाज आर्थिकदृष्ट्याही सक्षम व्हावा या हेतूने त्यांनी यादवेश को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना केली. त्यातून बचत गट, लघुउद्योगांना चालना, आणि आर्थिक साक्षरतेचा प्रचार करण्यात आला. आपला समाज हा मोलमजुरी करणारा, शेती करणारा, पशुपालक समाज आहे. त्यांना हक्काचे घर मिळावे याकरिता गवळी समाजासाठी सुलभ घरांची संकल्पना मांडली. योजना सत्यात उतरली.

भानुदास यादव यांना समाज संघटित राहावा, जागरूक व्हावा आणि आपले हक्क मिळवण्यासाठी सजग राहावा यासाठी नेहमी धडपड होती. नांदेडपासून, मुंबई, दिल्लीपर्यंत यादव महासभेच्या विविध स्तरांशी संपर्क साधत त्यांनी समाज संघटनाची वारी नित्यनेमाने केली. यादव समाजातील नेतृत्वाशी संवाद साधून ते एकजूट, आत्मभान आणि परिवर्तन यासाठी सातत्याने झगडत राहिले. त्यांनी कोणत्याही पदासाठी, प्रसिद्धीसाठी अथवा स्वार्थासाठी काम केले नाही, तर हे कार्य हेच त्यांच्या जीवनाचे अंतिम ध्येय होते.

आपल्या सेवा निवृत्तीनंतर त्यांनी २००६ साली प्रज्ञा जागृती मिशन या संस्थेची नोंदणी करून युवकांना मार्गदर्शन, महिलांचा सशक्तीकरण आणि समाजातील विविध स्तरांमध्ये वैचारिक जागृतीचा कार्यक्रम राबवला. बेरोजगार युवकांसाठी त्यांनी पॅट सिक्युरिटी सर्व्हिसेसची स्थापना केली, जरी काही तांत्रिक कारणांमुळे ही संस्था फार काळ चालली नाही तरीही त्यामागील उद्देश समाजाभिमुख होता. सामाजिक, आर्थिक विकास करायचा असल्यास विवाह कार्यात होणारा पैशाचा अपव्यय टाळला जावा याकरिता पूर्वीपासूनच ते सामूहिक विवाह संकल्पनेला समर्थन देत होते. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह सामूहिक विवाह समारोहात करून त्यांनी स्वतःच्या घरापासून समाजउन्नतीस हातभार लावला आणि इतरांनाही प्रेरित केले. यादव यांच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सहकार आणि अध्यात्मिक उपक्रमांना जेवढे त्यांचे स्वतःचे समर्पण कारणीभूत होते, तेवढाच महत्वाचा सहभाग त्यांच्या सहयोगी कार्यकर्त्यांचा होता. इंदरचंद रौत्रे, भोलाराम लंकाढाई ,बजरंग चौधरी, नरसिंग मंडले, लखनलाल जांगडे, बाबुलाल रौत्रे, प्रभुलाल भातावाले, ईश्वरलाल बटावाले, बिशनकुमार यादव, ॲड. मदनकुमार यादव, खेमचंद मंडले, मोहनलाल कुटलीया आदींनी त्यांच्या प्रत्येक उपक्रमात खांद्याला खांदा लावून साथ दिली. २८ जुलै २०२० रोजी कोरोनाच्या महामारी काळात, त्यांना कोरोनाने ग्रासले व या जगातून ते निघून गेले. मात्र त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा दीप अजूनही तेवत आहे. हा दीप समाजासाठी प्रेरणास्रोत ठरतो आहे. त्यांचे जीवन म्हणजे सेवाभाव, नेतृत्व, संघटन, शिक्षण आणि सहकार यांचा एक अखंड प्रवाह होता. त्यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचा संकल्प करूया हेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**-डॉ. प्रा. कैलाश यादव**
नांदेड
मो. ९४२०६६८८८६

# सर्वोत्तम ग्राहकसेवेसह पूर्ण क्षमतेने वीजबिल वसुली गरजेची

## कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांची सूचना

**हिंगोली** - वीज पुरवठा खंडित कालावधी कमी करणे, नादुरुस्त यंत्रणा तत्काळ दुरुस्त करणे, नवीन वीज जोडण्या तत्काळ देऊन ग्राहकांना अधिकाधिक सर्वोत्तम सेवा देण्यासह ग्राहकांनी वापरलेल्या विद्युत देयकांची नियमितपणे वेळेत वसूली करण्याच्या सुचना महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी शनिवारी (२६जुलै) दिल्या.

हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शनिवारी हिंगोली मंडलातील महावितरणच्या अधिकारी-कर्मचारी यांची वीजविषयक कामाची आढावा बैठक झाली. बैठकीस नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता श्री. राजेशसिंग चव्हाण, कार्यकारी अभियंता श्री सुरेंद्र मुंगारे व अमोल मोरे यांच्यासह सर्व अतिरिक्त कार्यकारी अभियंते, हिंगोली, औंढा(ना.), वसमत, कळमनूरी व सेनगाव विभागाचे उपकार्यकारी अभियंते व वित्त व लेखा विभागाचे अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

आढावा बैठकीत श्री. औंढेकर यांनी ग्राहक सेवा सुधारणा कार्यक्रमावर भर देताना नवीन वीज जोडण्या, यंत्रना दुरुस्ती कामावर लक्ष देऊन वीज पुरवठा अखंडित आणि सुरळीत ठेवून अधिकाधिक चांगल्या ग्राहकसेवा देण्याचे आवाहन केले. वारंवार वीजपुरवठा खंडित होणाऱ्या वीज वाहिन्यांवरही विषेश लक्ष देऊन तशा वाहिन्यांवरील वीज पुरवठा खंडित कालावधी कमी करण्याचे सुचविण्यात आले.

कुसुम-बी योजनेंतर्गत ऑफ ग्रीड सौरकृषी पंप आणि मागेल त्याला सौरकृषी पंप, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेचाही शेतकऱ्यांना लाभ देण्याचेही आवाहन त्यांनी केले. प्रधानमंत्री सौरघर मोफत वीज योजनेंतर्गत होत असलेल्या कामाचाही आढावा यावेळी घेण्यात आला.

## थोडक्यात...

### नागरिकांना छत्र्याचे वाटप

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** श्रीसंत गंगाजी बापू देवस्थान येथे सामाजिक कार्यकर्ते आनंद सोनटक्के यांच्या वतीने नागरिकांना छत्र्या वाटप करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

श्रीसंत गंगाजीबापू देवस्थान येथे सामाजिक बांधिलकी जपत विविध कार्यक्रम घेऊन सर्वसामान्य जनतेला विविध उपक्रमातून सामाजिक कार्यकर्ते आनंद सोनटक्के हे वेळोवेळी मदत करत असतात. पावसाळ्याचे दिवस असल्याने त्यांनी नागरिकांना मोफत छत्र्या वाटप केल्या आहेत. यावेळी प्रकाश गंगासागरे, गंगाधर सोनटक्के, अरविंद सोनटक्के यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### अरविंद पानपट्टे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अरविंद किशनराव पानपट्टे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून



कॉम्प्यूटर सायन्स या विषयात उत्कृष्ट संशोधनासाठी डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी डेव्हलपमेंट ऑफ सिक्युअर डिजिटल ट्रान्झॅक्शन्स थ्रू हायब्रिड बायोमेट्रिक टेक्निक्स या विषयावर त्यांनी आपल्या मार्गदर्शक प्रा. डॉ. एस. डी. खमित्कर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. तसेच त्यांच्या संशोधन कार्यामध्ये स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेसचे संचालक प्रा. डॉ. जी. व्ही. चौधरी, प्रा. डॉ. एच. एस. फडेवार, प्रा. डॉ. पी. यु. भालचंद्र, प्रा. डॉ. एन. के. देशमुख, प्रा. डॉ. ए. एच. साबळे, प्रा. डॉ. एस. एन. लोखंडे, प्रा. डॉ. एस. आर. मेकेवाड, प्रा. डॉ. महामुने, प्रा. डॉ. दरक, प्रा. डॉ. वांगिकर यांचे सहकार्य तसेच मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या रक्तदान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद



सदरील रक्त हे गरीब व गरजू रुग्णांना मोफत दिले जाणार असून दि क्रिसेंट सेंटर येथे हे रक्त उपलब्ध होणार आहे. गरीब व गरजू रुग्णांनी मोहम्मद अतीक मो. ९५१८७३७८२० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील गोकुळनगर चौक येथे रविवारी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहरच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १८५ जणांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन लोहा कंधार विधानसभेचे आ. प्रताप पाटील चिखलीकर तसेच माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते फित कापून सदर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या रक्तदान शिबिराचे आयोजन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण, मोहम्मद अतीक मोहम्मद इशरत यांनी आयोजन केले.

यावेळी माजी खा, भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, शहराध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, महिला जिल्हाध्यक्षा सुरेखाताई पाटील, संदीपसिंघ गिल महाराज, गफार खान, दीपक पावडे, सुनील नानवटे, उत्तमराव सोनकांबळे, श्रीधर नागापूरकर, शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण, ग्रामीणचे युवक जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, युवक कार्याध्यक्ष माधव पाटील चिंचाळे, शहर सरचिटणीस मोहम्मद आतीक मोहम्मद इशरत, अब्दुल आतिक. आयुब पठाण, भीमराव देशमुख, एजाज मिर्झा बेग, शेख इमरान, फिरोज बेग, शेख अमीर, आकाश भालेराव, युनूस खान, मोहम्मद अश्फाक, मोहम्मद जुबेर, शेख सलीम, विकी निखाते, येराज पटेल, रवी भालेराव, दिगंबर बाबर यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वयंरोजगार निर्मिती शिक्षण ही काळाची गरज –डॉ. दिलीप पुंडे



**मुखेड (प्रतिनिधी)–** स्वयंरोजगार निर्मिती शिक्षण ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन मुखेड भूषण डॉ. दिलीप पुंडे यांनी केले. सुप्रभात मित्र मंडळ मुखेडच्यावतीने विविध क्षेत्रात नैपुण्य मिळवलेल्या गुणवंताच्या सत्कार समारंभात अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रभात चे अध्यक्ष लक्ष्मण पत्तेवार सचिव जीवन कवटीकवार, संघटक अशोक कोत्तावार, सत्कारमूर्ती शिवाजी कोनापुरे, अभियंता साक्षी कुलकर्णी, अभियंता प्रज्वल कवटीकवार यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. मुखेड येथील जेष्ठ पत्रकार शिवाजी कोनापुरे यांची राज्य शासनाच्या डॉ. राजासिंह चौव्हाण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुखेड येथे अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली. वसंतनगर कोटयाळ येथील सेवादास माध्यमिक विद्यालयाचे कर्मचारी तथा राठोड परिवाराचे विश्वासू सदस्य दिनेश कुलकर्णी यांची कन्या साक्षी दिनेश कुलकर्णी यांची रिलायन्स कंपनी जामनगर गुजरात येथे अभियंता म्हणून निवड करण्यात आली. मार्केट कमिटीचे माजी सदस्य प्रकाश कवटीकवार यांचे नातू प्रज्वल प्रशांत कवटीकवार यांची इन्फोसिस कंपनीत बेंगलोर येथे अभियंता म्हणून निवड झाली. याबद्दल तिघांचा सुप्रभात मित्र मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी अभियंता साक्षी कुलकर्णी व प्रज्वल कवटीकवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी साक्षी कुलकर्णी म्हणाली की, सुप्रभात मित्रमंडळाने पुंडे यांच्या हस्ते माझा केलेला सत्कार मी हा क्षण कधीही विसरू शकणार नाही व मला मिळालेल्या सेवेच्या पहिल्या संधीचे मी सोने केल्याशिवाय राहणार नाही. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुप्रभातचे सचिव जीवन कवटीकवार यांनी केले तर लक्ष्मण पत्तेवार यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाराव आगलावे यांनी केले तर डॉ. वीरभद्र हिमगिरे यांनी आभार मानले. कार्यक्रमात दिनेश कुलकर्णी, सौ.सुषमा दिनेश कुलकर्णी, प्रशांत कवटीकवार यांच्यासह डॉ. एम.जे. इंगोले, डॉ. आर. जी. स्वामी, नंदकुमार मडगुलवार, गोपाळ पत्तेवार, नारायणराव बिलोलीकर, बालाजी वट्टमवार, उत्तमराव कुलकर्णी, लक्ष्मीकांत चौधरी, मनोज जाजु, सूर्यकांत कपाळे, दिनेश चौधरीसह यावेळी अनेकांची उपस्थिती होती. सुप्रभात मित्र मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे.

# स्वा. सावरकर जयंती महोत्सवानिमित्त सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वा. सावरकर जयंती महोत्सवानिमित्त नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय नांदेड संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कारांचे वितरण दि. २९ जुलै रोजी कुसूम सभागृह येथे होणार आहे.

या वर्षी पासून देण्यात येणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार ॲड. दिलीपभाऊ ठाकूर (स्वा. सावरकर विचारप्रवर्तक व लेखक), डॉ. मालपाणी संतोष (मधुमेह तज्ञ), डॉ. मल्हार लाटकर (आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संशोधक), डॉ. मुकुंद करंबेळकर (स्त्रीरोगतज्ञ व ज्येष्ठ नाट्यकलावंत) यांना गौरविण्यात येणार आहे. हा गौरव म्हणजे समाजहितासाठी कार्यरत राहणाऱ्या विचारवंताच्या कार्याची एक सार्वजनिक मान्यता आहे. ॲड. दिलीप ठाकूर यांना त्यांचा १०२ वा पुरस्कार म्हणून या गौरवाने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या व्यासंगी लिखाण, समाजप्रबोधन आणि अमरनाथ यात्रेच्या माध्यमातून प्रकटलेली राष्ट्रभावना या कार्याची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येत आहे. ॲड. दिलीप ठाकूर यांनी २२ वर्षांत १३ लाखापेक्षा जास्त रुग्णांना भाऊचा डबा वितरित केले आहेत, या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कार वितरण कार्यक्रमावेळी सावरकर व्याख्यानमालेचे उद्घाटन राष्ट्रीय सह-संघटन मंत्री, अ.भा.वि.प., मुंबई देवदत्त जोशी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सिनेदिग्दर्शक, सावरकर अभ्यासक योगेश सोमण आणि ज्येष्ठ साहित्यिक व अभ्यासक प्रा.शेषेराव मोरे यांचे व्याख्यान ठेवण्यात आले आहे. याप्रसंगी आ.बाबुराव कोहळीकर, आ.प्रतापराव चिखलीकर, आ.भीमराव केराम, भाजपा नांदेड शहराध्यक्ष अमर राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाला सावरकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, अभिनव भारत शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष कैलाशचंद काला, सचिव ॲड. सी. वनिता जोशी,प्रा. डॉ. संतोष कोटुरवार, उपप्राचार्या प्रा. डॉ. कल्पना कदम, उपप्राचार्या प्रा. डॉ. अर्चना भवानकर यांनी केले आहे.

# श्री गुरू गोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विजय दिन साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताच्या इतिहासात अनेकवेळा परकीय आक्रमणांचा सामना करावा लागला. तथापि भारतीय स्वराष्ट्राच्या संकल्पनेला विसरले नाहीत. अनेक योध्दे, क्रांतीकारकांनी एक राष्ट्र या संकल्पनेसाठी लढा दिला. १९९९ मध्ये झालेल्या कारगील युध्दामध्ये भारतीय सैनिकांनी अतुलनीय पराक्रम केलेला आहे. २६ जुलै हा विजय दिन केवळ एक दिवस नसून तो भारताच्या शौर्य, बलिदान व स्वराज्याच्या संस्कृतीचा उत्सव आहे. हा विजय दिवस साजरा करून राष्ट्र भक्तीचा संकल्प पुन्हा जागविण्यासाठी श्री गुरू गोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले.

त्या अनुषंगाने श्री गुरूगोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे २६ जुलै रोजी विजय दिन साजरा करण्यात आला. विजय दिनानिमीत्त माजी सुभेदार गोविंद शेवाळकर, लक्ष्मण विश्वास, सखाराम जोशी तसेच विरांगणा श्रीमती सरोजनी शिनगार पुतळे, श्रीमती शितल कदम यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख वक्ते उभेदळ पी. बी. शि. नि. यांनी आपल्या भाषणात ऐतिहासीक काळात राजे महाराजांनी लढलेल्या लढाया त्यांचे शौर्य तसेच भारताला स्वातंत्र्य मिळवून देणेसाठी ज्या वीर योद्धांनी प्राणांची आहुती दिली, या सर्वांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमादरम्यान भारताने लढलेल्या आजपर्यंतच्या लढाया याबाबतची चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच भारताने आज केलेली शस्त्रांमधील प्रगती त्यांची ओळख चित्रफितीच्या माध्यमाद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना दाखवण्यात आली. कारगील युध्दात प्रत्यक्ष सहभाग घेतलेले माजी सुभेदार सखाराम जोशी यांनी आपले युध्दातील अनुभव सांगितले. उद्योग निरीक्षक तथा माजी सैन्य अधिकारी सतीश चव्हाण यांनी आपल्या भाषणात प्रत्येक नागरीक हा सैनिक आहे, फक्त भावना जागृत व्हायला पाहिजे तसेच सैनिक हा एक विचार आहे, प्रत्येकाने जबाबदारी योग्य पध्दतीने /सद्विवेक बुध्दीने निभावणे म्हणजे सैनिक होय असे आपल्या भाषणात नमूद केले. प्राचार्य सचिन सुर्यवंशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकारी पोतदार डी. ए. यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# शिवा कर्मचारी महासंघाच्यावतीने गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना कर्मचारी महासंघ नांदेड शाखेच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी सप्तगिरी बॅंक्वेट हॉल, कौठा नांदेड येथे करण्यात आले आहे.

शिवा कर्मचारी महासंघाच्यावतीने मागील २५ वर्षांपासून गुणवंतांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला जातो. सन २०२५ च्या कार्यक्रमात समाजातील एमपीएससी व यूपीएससी सेवा निवड झालेले उमेदवार, नीट व जेईई प्रवेशपात्र विद्यार्थी, विद्यापीठस्तरावर पदवी व पदव्युत्तर सुवर्णपदक, नेट-सेट उत्तीर्ण विद्यार्थी, पीएच. डी. प्राप्त उमेदवार, सीए परीक्षा उत्तीर्ण, या वर्षात शासकीय सेवेत दाखल उमेदवार, शासकीय सेवेतून निवृत्त कर्मचारी, इयत्ता दहावीत ८०% पेक्षा अधिक गुण व इयत्ता बारावीत ७५% पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी, नवोदय प्रवेश पात्र, इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. पात्र उमेदवार व विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकांच्या सत्यप्रतीसह नावे नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांनी आपली नावे विश्वनाथ कोळगिरे ७५८८४२८५५६, गुणवंत मांजरमकर ७५८८४२५३२२ या व्हॉटसअॅप क्रमांकावर नोंदवावीत, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संभाजी पावडे, रवींद्र पांडागळे, सरचिटणीस व्यंकटेश भोगाजे, शिवकुमार देशमुख, प्रसिद्धीप्रमुख गंगाधर मंगनाळे, विठ्ठल मुखेडकर, मार्गदर्शक बाबुराव फसमले, डी.एम. पांडागळे, रमाकांत पाटील, संजय देशमुख, नरसिंग सोनटक्के, रामकिशन पालीमकर, बाबुराव कैलासे, विजय होपळे, शिवाजी कहाळेकर, बी.एस. पांडागळे, आनंदा खंदारे, वसंत जारीकोटे, माधव मुंडकर, शिवराज साधू, संदीप टाकळे, संजय बिरादार, विनायक होनशेट्टे, सतीश अर्धापुरे, संजय वाकोडे, गणेश मुगावे, देवीदास टाले, गणेश देशमुख, गंगाधर बेळगे, शरद हंद्रे, नागनाथ बडुरे, व्यंकट हुनगुंदे, बाळासाहेब बारसे, दीपक गाढवे, मनोहर पेटकर यांनी केले आहे.

# मराठवाड्यातील रेल्वे विकासाबाबत खा. गोपछडेंनी घेतली रेल्वेमंत्र्यांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्याच्या रेल्वे विकासासंदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची खा. डॉ अजित गोपछडे यांनी भेट घेऊन चर्चा केली.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या काम काजवेळी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीत राष्ट्रीय महत्त्वाच्या नांदेड - लातूररोड नवीन लोहमार्गाला मंजुरी द्यावी. हा मार्ग एकाच राज्यांतर्गत असल्याने मंजुरी देणे सोपे आहे. महाराष्ट्र राज्य सरकारनेही अर्धा हिस्सा देण्यास संमती दर्शवली आहे. नांदेड - देगलूर-बिदर नवीन लोहमार्गाला मंजुरी द्यावी. बोधन - बिलोली- नरसी -मुखेड- लातूररोड नवीन लोहमार्गाला मंजुरी द्यावी. परभणी-छत्रपती संभाजीनगर लोहमार्ग दुहेरीकरणाला भरीव निधी द्यावा. प्रस्तावित नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा अनावश्यक स्लॅक टाईम कमी करावा. नांदेड-पटना नवीन अमृत भारत एक्सप्रेस सुरू करावी. नांदेड- चेन्नई दैनंदिन एक्सप्रेस गाडी सुरू करावी. हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकाचा अमृत भारत रेल्वे स्थानक विकास योजनेअंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील महत्वपूर्ण स्टेशन सारखा विकास करावा, मराठवाड्यातील धर्माबाद-मुदखेड, उदगीर-परळी वैजनाथ लोहमार्ग नांदेड रेल्वे विभागाला जोडावा जेणेकरून परिचालन व्यवस्थापनात सुधारणा होईल, यासह आदी मागण्या यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केल्या आहेत. या सर्व मागण्यांच्या अनुषंगाने सकारात्मक विचार करू, असा विश्वास केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे यांना दिला आहे.

# डी.के.पाटील फार्मसी महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** डी.के. पाटील फार्मसी महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. बी. फार्मसीतील कोमल गायकवाड, होळगीर बालाजी, विनायक सोनटक्के या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी भारताच्या बहादूर सैनिकांचं स्मरण या दिवशी केलं जातं. भारताच्या सैनिकांनी पाकिस्तान विरुद्ध १९९९ ला लढताना आपल्या प्राणाची बाजी लावत विजय मिळवून दिला, ते एक युद्ध नव्हतं तर भारताची हिम्मत, एकता आणि बलिदानाचं प्रतीक होतं असे त्यांनी सांगितले. त्यानंतर कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यीनी प्रज्ञा तीरपुडे हिने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर, उप-प्राचार्य नरेंद्र पत्रे व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातोश्री मुक्ताई धोंडगे यांचा स्मृतिदिन साजरा; गीतकार प्रा. प्रशांत मोरे यांच्या कवितांचे सादरीकरण

**लोहा (प्रतिनिधी)–** लोह्यात मराठी चित्रपट गीतकार, कवी, प्रा. प्रशांत मोरे यांच्या कवितांचे सादरीकरण करून मातोश्री मुक्ताई धोंडगे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

महाराष्ट्रातील प्रख्यात कवी, मराठी चित्रपट गीतकार प्रशांत मोरे यांच्या कवितांनी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारच्या प्रेरणास्थान मातोश्री मुक्ताई धोंडगे यांचा ६१ वा स्मृतिदिन संपन्न झाला. यावेळी प्रशांत मोरे यांनी 'मला शाळेत पाठवायची माय', 'बाप नारळ खोबरं, माय नारळातलं पाणी', तसेच विविध अशा कविता , शेतकऱ्यांच्या, आई - वडिलांच्या व्यथा आपल्या बहारदार शैलीत सादर केल्या.



लोहा येथील श्री संत गाडगे महाराज प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जुलै रोजी तुळजाई मंगल कार्यालय, लोहा येथे सदरील कार्यक्रम संपन्न झाला. याच कार्यक्रमात मातोश्री मुक्ताई धोंडगे यांच्या जीवन व कार्यावर आधारित प्रा.महेश मोरे द्वारा लिखित व डॉ. शोभा शिंदे द्वारा इंग्रजी अनुवादित 'मुक्ताई' या किशोर कादंबरी चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.अशोकराव गवते यांनी म्हटले की, मातोश्री मुक्ताई धोंडगे यांनी मन्याड खोऱ्यातील मागासलेल्या भागात शिक्षणाची ज्ञानगंगा प्रवाहित करण्यासाठी केशवरावजींना प्रेरणा दिली. याबरोबरच या मातोश्रीने तत्कालीन समाजातील अनेक अनिष्ट प्रथा परंपरांना पायदळी तुडवताना समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. याबरोबरच वस्तीगृहातील कर्मचाऱ्यांना भाकरी घातल्या, पददलित नाही रे वाल्यांना जवळ घेतले. म्हणून अशा मातोश्रींच्या कर्तुत्वाचा सन्मान झाला पाहिजे, त्यांच्या कार्याचा लेखाजोखा नव्या पिढीला कळाला पाहिजे म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

वरिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष व्ही.जी. चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून मातोश्री मुक्ताई धोंडगे यांच्या जीवन व कार्यावर भाष्य केले. प्रा.महेश मोरे यांनी 'मुक्ताई' या किशोर कादंबरी च्या निर्मितीची प्रक्रिया, त्याचबरोबर मुलांसाठी या कादंबरीचे महत्त्व विशद केले.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते रणधीरसिंह शंकरसिंह गहेरवार हे होते तर यावेळी गुराखीपिठावर वरील मान्यवरांसोबतच माजी जि.प सदस्या प्रा.डॉ. सौ. संध्याताई मुक्तेश्वरराव धोंडगे, प्रा.डॉ. सौ. मनिषाताई पुरुषोत्तमराव धोंडगे, सौ. जयक्रांतीताई अशोकराव गवते, सौ.मणकर्णिकाताई कामाजीराव जाधव, हभप माधव महाराज गीते, कादंबरीकार प्रा. महेश मोरे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोकराव गवते, महाविद्यालयाचे अध्यक्ष व्ही. जी.चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक डी.एस बोधगिरे, सूर्यकांत लुंगारे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.जयराम सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नानासाहेब सूर्यवंशी यांनी केले.

# आदिवासी महादेव कोळी समाजाचे प्रश्न जटाळे यांनी मांडले राष्ट्रपती भवनात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासी जमातीत कोळी महादेव समाजातील जातवैधता प्रमाणपत्रासाठी होणारी विद्यार्थ्यांची समस्या तात्काळ सोडविली जावी अशी मागणी राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांच्याकडे केली.

नवी दिल्ली येथे राष्ट्रपतींनी भारतातील आदिवासी समाजाच्या विकासासंदर्भात संवाद बैठक आयेजित करण्यात आली होती. यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक तथा भाजपाचे नांदेड अनुसूचित जमाती मोर्चा महानगर अध्यक्ष विश्वनाथ नामदेव जटाळे राष्ट्रपती भवनात आदिवासी महादेव कोळी समाजाचे प्रश्न मांडले.

भारताच्या राष्ट्रपती यांनी भारतातील आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात संवाद बैठक राष्ट्रपती भवन येथे आदिवासी क्षेत्रातील प्रख्यात व विविध क्षेत्रातील व्यक्तीमत्व यांच्याशी संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आठ राज्यातून ४० जणांना निमंत्रित करण्यात आले होते, यावेळी महाराष्ट्र राज्यातून सहा जणांचा समावेश होता, यात नांदेड जिल्ह्यातील वसरणी येथील सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक विश्वनाथ जटाळे यांच्या समावेश होता.



आदिवासी समाजाच्या कोळी महादेव या जमातीतील आदिवासींना जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यास अडचणी येत आहेत व उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर वैधता प्रमाणपत्र वितरण होत असल्याने शिक्षणास व नोकरी संबंधितांना त्रास सहन करावा लागत आहे, गरीब आदिवासी माणूस व विद्यार्थी न्यायालयापर्यंत पोहचू शकत नसल्याने मराठवाड्यातील व नांदेड जिल्ह्यातील अनेक समाज बांधव वैधता प्रमाणपत्र पासून वंचित आहेत. शासनाकडून संबंधिताची चौकशी करून न्याय मिळावा असे पत्र राष्ट्रपती यांना दिले आहे.

यावेळी केंद्रीय आदिवासी मंत्री जे.एल.ऊराव, राज्यमंत्री दुर्गादास ऊईके, भाजपा जनजाती मोर्चा अध्यक्ष खा.समीर ओराव, महाराष्ट्र जिल्हा संघटन मंत्री किशोर काळकर, महामंत्री प्रकाश गेडाम, सुदर्शन शिंदे, राजश्री काळे, रमेश मावसकर यांची उपस्थिती होती.

# प्रगतीमंत्र



## गुन्ह्यांची रहस्ये उलगडण्यात रस आहे का?

### १२ वीनंतर फॉरेन्सिक सायन्समध्ये करिअर कसे बनवायचे?

**जर तुम्हाला गुन्ह्यांच्या जगातील गूढ प्रकरणे उलगडण्यात रस असेल आणि वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर व्यतिरिक्त काहीतरी बनण्याची इच्छा असेल तर हा लेख तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. तुम्हाला विज्ञानासोबतच गुन्हेगारी कथांमध्येही रस असेल, तर फॉरेन्सिक सायन्स तुमच्यासाठी एक उत्तम करिअर पर्याय असू शकतो.**



#### फॉरेन्सिक सायन्स म्हणजे काय?

फॉरेन्सिक सायन्सला न्यायवैद्यक विज्ञान म्हणतात. ही गुन्ह्याच्या पुराव्यांचा वैज्ञानिकदृष्ट्या तपास करण्याची प्रक्रिया आहे, ज्याद्वारे गुन्हेगारांपर्यंत पोहोचले जाते. याद्वारे, गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेल्या पुराव्यांचे जसे की रक्त, केस, नखे, बोटांचे ठसे, कोणत्याही प्रकारचा डेटा इत्यादींचे विश्लेषण करून गुन्हेगारापर्यंत पोहोचणे खूप सोपे होते. हे एक आंतरविद्याशाखीय विज्ञान आहे, ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, संगणक विज्ञान आणि गुन्हेगारीशास्त्र असे विषय आहेत.

#### करिअर कसे करावे?

जे विद्यार्थी १२वी नंतर या महत्त्वाच्या क्षेत्रात करिअर करण्याचा विचार करत आहेत, त्यांच्यासाठी फॉरेन्सिक सायन्समध्ये बॅचलर ऑफ सायन्स (बीएससी) करणे ही या रोमांचक क्षेत्रात प्रवेश करण्याची गुरुकिल्ली आहे. तथापि, यासाठी, तुम्हाला प्रथम विज्ञान शाखेतून बारावीची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. हे अभ्यासक्रम ३ वर्षांचे : फॉरेन्सिक सायन्समध्ये बीएससी, फॉरेन्सिक सायन्समध्ये बीएससी (ऑनर्स), फॉरेन्सिक सायन्स आणि क्रिमिनोलॉजीमध्ये डिप्लोमा, सायबर फॉरेन्सिक्स, फिंगरप्रिंट सायन्स इत्यादींमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

#### कुठे करू शकता काम?

फॉरेन्सिक सायन्सचा अभ्यास केल्यानंतर, तुमच्याकडे नोकरीच्या अनेक संधी आहेत. विविध नोकरीच्या भूमिकांमध्ये, तुम्ही पोलिस विभाग, सीबीआय, एनआयए, फॉरेन्सिक सायन्स लॅब (एफएसएल), कोर्ट, इंटेलिजेंस ब्युरो (आयबी) आणि खाजगी गुप्तहेर कंपन्यांमध्ये काम करू शकता.

#### शिक्षणसंस्था

दिल्ली विद्यापीठ
पंजाब विद्यापीठ
गुजरात फॉरेन्सिक सायन्सेस विद्यापीठ
अन्नामलाई विद्यापीठ
बनारस हिंदू विद्यापीठ

#### करिअर पर्याय

फॉरेन्सिक लॅब ॲनालिस्ट
क्राइम सीन इन्व्हेस्टिगेटर
ड्रग ॲनालिस्ट
डीएनए ॲनालिस्ट
फिंगरप्रिंट एक्सपर्ट
फॉरेन्सिक ऑडिटर
सायबर फॉरेन्सिक एक्सपर्ट

#### कौशल्ये अन् पात्रता...

जर तुम्हाला या क्षेत्रात चांगले करिअर करायचे असेल, तर पदवी व्यतिरिक्त, तुमच्याकडे काही इतर कौशल्ये असणे आवश्यक आहे, जी तुमच्या सतत वाढीसाठी आणि यशासाठी आवश्यक आहेत. निरीक्षण कौशल्ये, तार्किक आणि विश्लेषणात्मक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, तांत्रिक ज्ञान, रिपोर्टिंग आणि डॉक्युमेंटेशनचे कौशल्य.

#### पगार किती आहे?

फॉरेन्सिक सायंटिस्ट सुरुवातीच्या स्तरावर दरमहा २५,००० ते ४०,००० रुपये कमवू शकतो. वाढत्या अनुभव आणि कौशल्यासह पगार देखील वाढतो, जो दरमहा ८०,००० ते १ लाख रुपये किंवा त्याहून अधिक असू शकतो. तुमची वाढ आणि पगारवाढ तुम्हाला मिळणाऱ्या संधी आणि तुमच्या कौशल्यांवर अवलंबून असते. फॉरेन्सिक सायन्स हे केवळ एक रोमांचकच नाही तर एक आव्हानात्मक करिअर देखील आहे. जर तुम्हाला गुन्हे वैज्ञानिक पद्धतीने सोडवण्यात रस असेल आणि न्याय देण्याच्या प्रक्रियेत योगदान देऊ इच्छित असाल तर हे क्षेत्र तुमच्यासाठी एक उत्तम करिअर पर्याय असू शकते.






## यंदा CLAT परीक्षा ७ डिसेंबर रोजी होणार

### नोंदणी १ ऑगस्टपासून, संपूर्ण वेळापत्रक जाणा

**नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीजच्या (NLUs) कन्सोर्टियमने कॉमन लॉ प्रवेश परीक्षा (CLAT) २०२६ च्या तारखा जाहीर केल्या आहेत. CLAT परीक्षा २०२६ पेन-पेपर (ऑफलाइन) पद्धतीने घेतली जाईल. कन्सोर्टियम consortiumofnlus.ac.in च्या अधिकृत वेबसाइटवर एक सूचना जारी करण्यात आली आहे. त्यानुसार, CLAT २०२६ परीक्षा ७ डिसेंबर २०२५ रोजी घेतली जाईल.**



**जर तुम्ही देशातील प्रतिष्ठित लॉ विद्यापीठातून पदवी किंवा पदव्युत्तर पदवी करण्याचा विचार करत असाल, तर निर्धारित वेळेत नोंदणी करा. यासाठी अर्ज करण्याची विंडो कधी उघडेल आणि उमेदवार किती काळ नोंदणी करू शकतील, हे जाणून घेऊया...**

नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीजच्या कन्सोर्टियमने CLAT २०२६ ची तारीख जाहीर केली आहे. ही परीक्षा देशभरातील २४ राष्ट्रीय कायदा विद्यापीठांत अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट लॉ प्रोग्राममध्ये प्रवेश घेण्यासाठी घेतली जाते. २०२६ साठी CLAT ७ डिसेंबर २०२५ रोजी ऑफलाइन पद्धतीने घेतली जाईल. यासाठी अर्ज १ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भरता येतील.

#### कन्सोर्टियमकडून नोटीस जारी

कन्सोर्टियमच्या वेबसाइटवर एक नोटीस जारी करण्यात आली आहे. त्यात म्हटले आहे की, २० जुलै २०२५ रोजी झालेल्या राष्ट्रीय कायदा विद्यापीठांच्या कन्सोर्टियमच्या कार्यकारी समिती आणि नियामक मंडळाच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की कॉमन लॉ ॲडमिशन टेस्ट (CLAT) २०२६ रविवार, ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत आयोजित केली जाईल.

#### कोण अर्ज करू शकतात?

CLAT UG परीक्षेसाठी पात्रता बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सामान्य श्रेणीतील उमेदवारांनी किमान ४५% गुणांसह १२ वी उत्तीर्ण केलेली असावी आणि राखीव श्रेणीतील उमेदवारांनी ४० % गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी. तर, CLAT PG परीक्षेत बसण्यासाठी, उमेदवारांकडे LLB पदवी असणे आवश्यक आहे. (सामान्य श्रेणीसाठी किमान ४५% आणि SC, ST आणि PWD श्रेणींसाठी ४०% गुण).

#### नोंदणी करण्याचा सोपा मार्ग

- १ ऑगस्ट २०२५ रोजी नोंदणी पोर्टल सक्रिय झाल्यानंतर, उमेदवार या सोप्या टप्प्यांद्वारे अर्ज करू शकतात.
- सर्वप्रथम अधिकृत वेबसाइटवर जा. consortiumofnlus.ac.in
- आता नोंदणी करा या बटणावर क्लिक करा आणि तुमचे पूर्ण नाव, मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी प्रविष्ट करा.
- तुमच्या ईमेलवर एक ओटीपी येईल. याद्वारे तुमचे खाते सत्यापित करा आणि नंतर लॉगिन करा.
- तुमचे वैयक्तिक तपशील, पत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी प्रविष्ट करा. तुम्हाला ३ परीक्षा केंद्र प्राधान्ये देखील निवडाव्या लागतील.
- सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती जोडा.
- डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगद्वारे ऑनलाइन शुल्क भरा.
- भरलेला अर्ज फॉर्म पूर्णपणे तपासा आणि सबमिट करा.
- भविष्यासाठी कन्फर्मेशन पेज डाउनलोड करून ठेवा.

#### सविस्तर सूचना लवकरच

CLAT 2026 ची अधिकृत सूचना लवकरच CLAT वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल. त्यात अभ्यासक्रम, परीक्षा नमुना, गुणांकन योजना, अर्ज शुल्क, पात्रता निकष आणि इतर महत्त्वाची माहिती उपलब्ध असेल.



**सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी आनंदाची बातमी आहे. भारतीय सैन्य अग्निवीर कॉमन एन्ट्रन्स एक्झाम (सीईई) चा निकाल जाहीर झाला आहे. जून-जुलैमध्ये झालेल्या प्रवेश परीक्षेत बसलेले उमेदवार आता भारतीय सैन्याच्या अधिकृत वेबसाइट joinindianarmy.nic.in ला भेट देऊन फेज-१ चा निकाल तपासू शकतात. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी आता दुसऱ्या फेरीची तयारी करावी.**



## आर्मी अग्निवीर सीईई उत्तीर्ण झालात, फिजिकलचं काय?

खरं तर, भारतीय सैन्यात अग्निवीर भरतीद्वारे जनरल ड्युटी (जीडी), टेक्निकल, क्लर्क, स्टोअर कीपर टेक्निकल, ट्रेड्समन, सैनिक फार्मा, सैनिक टेक्निकल नर्सिंग असिस्टंट आणि महिला पोलिस पदांसाठी भरती केली जाईल. कॉमन एन्ट्रन्स परीक्षा ३० जून ते १० जुलै २०२५ पर्यंत चालली. लेखी परीक्षेत पात्र ठरलेले उमेदवार फेज-२ मध्ये बसतील.



#### निकाल २०२५ कसा तपासायचा?

- भारतीय सैन्याच्या अधिकृत वेबसाइट joinindianarmy.nic.in ला भेट द्या.
- होम पेजवरील भारतीय सैन्य अग्निवीर निकाल २०२५ लिंकवर क्लिक करा.
- लिंकवर तुमचे लॉगिन तपशील प्रविष्ट करा.
- सबमिटवर क्लिक केल्यानंतर, तुमचा निकाल स्क्रीनवर उघडेल, तो तपासा.
- अधिक संदर्भासाठी निकाल पृष्ठ डाउनलोड करा आणि प्रिंटआउट घ्या.

#### आर्मी अग्निवीर भरती फेज-२ मध्ये काय होईल?

निवड प्रक्रियेनुसार, लेखी परीक्षेत निवडलेल्या सर्व उमेदवारांना आता पुढील फेरीसाठी उपस्थित राहावे लागेल, ज्यामध्ये शारीरिक तंदुरुस्ती चाचणी (PFT), शारीरिक मापन चाचणी (PMT), वैद्यकीय चाचणी, कागदपत्रे पडताळणी (DV) आणि अनुकूलता चाचणी यांचा समावेश असेल.

#### अग्निवीर शारीरिक मापन

अग्निवीर पुरुष आणि महिला उमेदवारांसाठी किमान उंचीचा मानक १६२ सें.मी. आहे. उंचीनुसार, उमेदवारांचे वजन वैद्यकीय धोरणानुसार असले पाहिजे. त्याच वेळी, छातीच्या मापनासह ती ०५ सें.मी.पर्यंत फुगली पाहिजे. सिक्कीम, नागालँड, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय आणि आसाममधील उमेदवारांना उंचीमध्ये ४ सें.मी.ची सूट दिली जाईल.

#### आवश्यक कागदपत्रे

प्रवेशपत्र, २० पासपोर्ट आकाराचे फोटो (तीन महिन्यांपेक्षा जास्त जुने नाही), शिक्षण प्रमाणपत्रे, अधिवास / कायमस्वरूपी निवासाचा पुरावा, जातीचा दाखला (लागू असल्यास), धर्म प्रमाणपत्र (लागू असल्यास), पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र, शाळेचे चारित्र्य प्रमाणपत्र, चारित्र्य प्रमाणपत्र, क्रीडा प्रमाणपत्र, एनसीसी प्रमाणपत्र, पॅन किंवा आधार कार्ड, टॅटू प्रमाणपत्र (आदिवासी क्षेत्रातून असल्यास) इत्यादी. अधिक माहितीसाठी नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचा.

#### फिटनेस टेस्ट किती कठीण असेल?



लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना लवकरच अग्निवीर भरती मेळाव्याची तारीख, वेळ आणि ठिकाण कळवले जाईल. तसेच, प्रवेशपत्र अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केले जाईल. त्याआधी, फिटनेस टेस्ट किती कठीण असेल ते समजून घेऊया...

#### शारीरिक तंदुरुस्ती चाचणी

| लिंग | धावणे १.६ किमी | लांब उडी | उंच उडी | स्क्वॅट्स पुश-अप्स | गुडघे दुमडून सिट-अप्स |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | ७ मिनिटे ३० सेकंद | १० फूट | ३ फूट | २० | १५ |
| महिला | ८ मिनिटे | १० फूट | ३ फूट | १५ | १० |

## कॅनडामध्ये बना नर्स, वार्षिक पॅकेज किती माहितेय?

**कॅनडा आपली आरोग्यसेवा व्यवस्था सुधारू इच्छिते, जेणेकरून लोकांना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा मिळू शकतील. चांगल्या आरोग्यसेवा व्यवस्थेसाठी सर्वोत्तम नर्स आणि डॉक्टरांची आवश्यकता असते. सध्या, कॅनडामध्ये नर्सची मागणी जास्त आहे, त्यामुळे जर कोणाला कॅनडामध्ये जाऊन शिक्षण घ्यायचे असेल तर बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम त्यांच्यासाठी सर्वात परिपूर्ण असेल. या कोर्सनंतर तुम्हाला चांगला पगार मिळेल, सोबतच, कायमस्वरूपी निवासस्थानाचा (पीआर) मार्गही उघडतो.**

जर तुम्हाला कॅनडाला जाऊन उच्च शिक्षण घ्यायचे असेल, तर नर्सिंग हा तुमच्यासाठी सर्वोत्तम कोर्स ठरेल. अशा परिस्थितीत, कॅनडामध्ये बीएससी नर्सिंगमध्ये प्रवेश कसा मिळवायचा ते आम्ही सांगतो. नर्सिंग कोर्सनंतर पगार किती असेल? बीएससी नर्सिंग करण्यासाठी कोणती विद्यापीठे सर्वोत्तम आहेत? ते जाणून घेऊया...

#### प्रवेश कसा मिळेल?

कॅनडामध्ये बीएससी नर्सिंगचा अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. यामध्ये प्रवेशासाठी प्रथम विज्ञान शाखेतून १२वी करावी लागते. या दरम्यान, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि इंग्रजी यासारख्या विषयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी आयईएलटीएस स्कोअर देखील आवश्यक आहे. याशिवाय, स्टेटमेंट ऑफ पर्पज, शिफारस पत्र, पासपोर्ट इत्यादी महत्त्वाची कागदपत्रे देखील आवश्यक आहेत. या सर्व कागदपत्रांच्या मदतीने, नर्सिंग कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज करता येतो. नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, सरावासाठी NCLEX-RN नावाची परवाना परीक्षा देखील उत्तीर्ण करावी लागेल.

#### सर्वोत्तम विद्यापीठे

- टोरंटो विद्यापीठ
- अल्बर्टा विद्यापीठ
- ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठ
- मॅकमास्टर विद्यापीठ
- मॅकगिल विद्यापीठ
- क्वीन्स विद्यापीठ
- कॅलगरी विद्यापीठ
- ओटावा विद्यापीठ
- वेस्टर्न विद्यापीठ
मॉन्ट्रियल विद्यापीठ

#### नर्सेसचा पगार किती आहे?



कॅनडातील नर्सचा पगार त्यांच्या अनुभवावर, नोकरीच्या ठिकाणावर आणि विशेष क्षेत्रावर आधारित ठरवला जातो. नर्स प्रॅक्टिशनर्सना सर्वाधिक पगार मिळतो, त्यानंतर नोंदणीकृत नर्स आणि परवानाधारक प्रॅक्टिकल नर्सेसचा क्रमांक लागतो. साधारणपणे, कॅनडामध्ये नर्सेसचा सरासरी वार्षिक पगार ४३ लाख ते ५५ लाख रुपयांच्या दरम्यान असतो. प्रवेश स्तरावरील नर्सेसना दरवर्षी ३१ लाख ते ३८ लाख रुपयांच्या दरम्यान पगार मिळतो. अनुभवी नर्सेस दरवर्षी ७० लाख रुपयांपेक्षा जास्त कमाई करू शकतात.

# महाराष्ट्रातील सर्व शाळांचे होणार सुरक्षा ऑडिट

**मुंबई (प्रतिनिधी)** –राजस्थानमध्ये सरकारी शाळेची इमारत कोसळून सात विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना शुक्रवारी सकाळी प्रार्थनेवेळी घडली. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने पावले उचलत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कंबर कसली आहे.

शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी एका उच्चस्तरीय बैठकीत राज्यातील सर्व सरकारी शाळांचे सुरक्षा ऑडिट करण्याचे व धोकादायक इमारतींना तातडीने निधी देण्याचे निर्देश दिले आहेत. या आदेश भोयर यांनी आयोजित पत्रकार परिषदेतून दिले आहेत.

राजस्थानमधील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेतली. राज्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर शाळांच्या इमारतींच्या सद्यस्थितीचा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. राजस्थानसारखी दुर्दैवी घटना महाराष्ट्रात घडू नये, यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी अधिकाऱ्यांना केले.



# पुणे विमानतळावर १०.५ कोटी रुपयांचं ड्रग्ज जप्त, आरोपीला अटक

**पुणे (प्रतिनिधी)** आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर कस्टम्स अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई केली आहे. १०.४७ किलो 'हायड्रोपोनिक वीड' (मारिजुआना) जप्त केलं आहे. याचं अंदाजे बाजारमूल्य १०.५ कोटी रुपये आहे. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.



इंडिगो फ्लाइट क्रमांक ६ए-१०९६ द्वारा बँकॉकहून पुण्यात दाखल झालेल्या अभिनय अमरनाथ यादव या भारतीय नागरिकावर अधिकाऱ्यांना संशय आल्याने त्याची कसून झडती घेण्यात आली. तपासादरम्यान, त्याच्या ताब्यातील सामानात अंमली पदार्थ सापडले. सदर ड्रग्स हायड्रोपोनिक पद्धतीने तयार करण्यात आलेले उच्च प्रतीचे गांजा असल्याचं स्पष्ट झालं आहे. अशा प्रकारचे ड्रग्स बहुधा महागड्या क्लायंटसाठी स्मगल केले जातात, त्यामुळे ही तस्करी आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंधित असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.


## टी.सी हरवली

माझी अब्दुल तोहिद अब्दुल अहेमद या नावाची १० पासची गुणपत्रक व सनद हिमायतनगर ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.


**–संपर्क पत्ता–**

**अब्दुल तोहिद अब्दुल अहेमद**
**मो.९९२१६१७८७५**



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


# जिल्ह्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण

**लातूर(प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गोवर्गीय पशुधनात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव आढळून आला असून आतापर्यंत चार तालुक्यातील १२ गावांमध्ये एकूण ४७ बाधित गोवर्गीय जनावरांची नोंद झाली आहे. जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभागाने तातडीने सज्जता दाखवत शीघ्र कृती दल स्थापन केले आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व १३२ पशु चिकित्सालये व तीन फिरते पशु चिकित्सालय आदी पशुवैद्यकीय संस्थांना शासनाच्या मानक कार्यपद्धतीनुसार विलगीकरण, औषधोपचार, बाह्यपरोपजीवी नियंत्रण आणि डिसइन्फेक्शनबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. लसीकरण आणि प्रशासनाची तयारी लसींचा पुरेसा साठा: जिल्ह्यातील गोवर्गीय पशुधनासाठी १,७६,५०० लसी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १,५९,५०० लसीकरणासाठी वापर करण्यात आल्या आहेत. सध्या १७,००० लसी शिल्लक असून त्या तातडीने पशुपालकांच्या जनावरांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# झारखंडमध्ये तीन नक्षलवादी ठार, शस्त्रसाठा जप्त

**गुमला (प्रतिनिधी)–** झारखंडमधील गुमला जिल्ह्यात घाघरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लावादाग जंगलात पोलीस आणि सुरक्षा पथकाने संयुक्त कारवाई केली. या कारवाईत बंदी घातलेल्या झारखंड जन मुक्ती मोर्चा संघटनेचे तीन नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकाने घटनास्थळावरुन एक एके ४७ रायफल आणि दोन इन्सास रायफल यांच्यासह इतर शस्त्रसाठा जप्त केला. गुमला एसपी हारिश बिन जमां यांनी ही माहिती दिली.

खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीआधारे जंगलात पोलीस आणि सुरक्षा पथकाने संयुक्तपणे शोधमोहीम राबवली. शोधमोहीम सुरू असल्याचे लक्षात येताच नक्षलवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. या गोळीबाराला तातडीने प्रत्युत्तर देण्यात आले. चकमक सुरू झाली. अखेर चकमकीत झारखंड जन मुक्ती मोर्चा संघटनेचे तीन नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरुन सुरक्षा पथकाने शस्त्रसाठा जप्त केला.

याआधी १५ जुलै रोजी बोकारो जिल्ह्यातील गोमिया पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिरहोर्डेरा जंगलात सीपीआय माओवादी नक्षलवादी आणि सुरक्षा पथक यांच्यात चकमक झाली होती. या चकमकीत सुरक्षा दलांनी नक्षलवादी कुंवर मांझीसह दोन नक्षलवाद्यांना ठार मारले होते. कुंवर मांझीवर ५ लाख रुपयांचे बक्षीस होते.

बिरहोर्डेरा जंगलातील चकमकीत कोब्रा २०९ बटालियनचा एक जवान हुतात्मा झाला.

झारखंड पोलिसांनी या वर्षी राज्य नक्षलमुक्त करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. झारखंडमध्ये २०२५ च्या सुरुवातीपासून पोलिसांनी २२ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. या काळात नक्षलवाद्यांकडून ११५ शस्त्रे, ८५९१ गोळ्या, १७६.५ किलो स्फोटके आणि ४,५१,०४७ रुपये जप्त करण्यात आले आहेत. तसेच, १७९ आयईडी शोधून निष्क्रिय करण्यात आले. नक्षलवाद्यांविरुद्ध पोलिसांची ही एक मोठी कारवाई आहे.

## जाहीर प्रगटन

मौजे असर्जन ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नंबर १६३ मधील प्लॉट नंबर १७ साईज लांबी दक्षिण उत्तर १२.२० मी.व रूंदी पुर्व पश्चिम ९.०० मी.एकूण क्षे.१०९.८ चौरस मीटरचा प्लॉट सौ.अनिता वाकोजी डोके रा.एकदरा ता.जि.नांदेड यांचेकडून विठ्ठल प्रल्हादराव कुलकर्णी रा.सालेगाव ता.नायगावं जि.नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा पुर्वेस–प्लॉट नंबर १६, पश्चिमेस– प्लॉट नंबर १८, दक्षिणेस–बकाल यांची जमिन,उत्तरेस –९.०० मीटर रूंद रोड

वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**विठ्ठल प्रल्हादराव कुलकर्णी**
**रा.सालेगाव ता.नायगांव जि.नांदेड**
**मो.९४०३३२७४७५**

**पीठासीन अधिकारी यांचे कार्यालय, शाळा न्यायाधिकरण, लातूर– ४१३५१२**
ई–मेल–schooltribunallaturgmail.com दुरध्वनी क्रं.– ०२३८२–२२०६४०
जा.क्र.पी.अ/शान्याला/न्यासेल/आदेश/२०२५/४५५ दिनांक २३/०७/२०२५

## जाहीर समन्स

अपील. क्रमांक १३ /२०२५

**आशिष पंडीराव चव्हाण**
विरूध्द
सचिव,
लोकशिक्षण प्रसारक मंडळ बिजुर ता बिलोली जि नादेड.
प्रतिवादीचे नाव:–
**१. मुख्याध्यापक, त्रिशालादेवि प्रथमिक शाळा दत्ता नगर साठे चौक नादेड.**

सदर जाहिर समन्स/नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, अपिलार्थी आशिष पंडीतराव चव्हाण यांनी तुमच्या विरूध्द या न्यायालयात अपील क्र.१३/२०२५ दाखल केलेले आहे. या किरकोळ अर्जाच्या नोटीसा आपणास या पूर्वी पोहोच देय डाक नोंदीने अनेकदा पाठविलेल्या होत्या परंतू त्या आपण स्विकारत नाही व घेण्यास टाळाटाळ करीत आहात म्हणून अपिलार्थी ने विधिज्ञा मार्फत तुमची नोटीस वृत्तपत्रातून जाहिर करावी म्हणून निशानि क्र. १० वर अर्ज दाखल केलेला होता व तो मंजूर झालेला आहे म्हणून तुम्हास या जाहिर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, तुम्ही सदर अपिलाच्या संदर्भात आपले म्हणने मांडण्यासाठी या न्यायाधिकरणात स्वतः किंवा रितसर निर्धिष्ट केलेल्या विधिज्ञा मार्फत दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहूण सदरील अपिलास उत्तर दयावे व आपल्या बचावाचे कागदपत्रे या प्रकरणात सादर करावेत अन्यथा तुमच्या विरूध्द एकतर्फा आदेश करून या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीने व न्यायाधिकरणाच्या शिक्कया निशी देण्यात आले.

**आदेशावरून**
**(नागेश धोंडीराम चोले)**
**न्यायिक लिपीक शाळा न्यायाधिकरण, लातूर**

**पीठासीन अधिकारी यांचे कार्यालय, शाळा न्यायाधिकरण, लातूर– ४१३५१२**
ई–मेल–schooltribunallaturgmail.com दुरध्वनी क्रं.– ०२३८२–२२०६४०
जा.क्र.पी.अ/शान्याला/न्यासेल/आदेश/२०२५/४५७ दिनांक २३/०७/२०२५

## जाहीर समन्स

अपील. क्रमांक १४ /२०२५

**मुंजाजी माधवराव राजेगोरे**
विरूध्द
सचिव,
लोकशिक्षण प्रसारक मंडळ बिजुर ता बिलोली जि नादेड.
प्रतिवादीचे नाव:–
**१. मुख्याध्यापक, त्रिशालादेवि प्रथमिक शाळा दत्ता नगर साठे चौक नादेड.**

सदर जाहिर समन्स/नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, अपिलार्थी मुंजाजी माधवराव राजेगोरे यांनी तुमच्या विरूध्द या न्यायालयात अपील क्र.१४/२०२५ दाखल केलेले आहे. या किरकोळ अर्जाच्या नोटीसा आपणास या पूर्वी पोहोच देय डाक नोंदीने अनेकदा पाठविलेल्या होत्या परंतू त्या आपण स्विकारत नाही व घेण्यास टाळाटाळ करीत आहात म्हणून अपिलार्थी ने विधिज्ञा मार्फत तुमची नोटीस वृत्तपत्रातून जाहिर करावी म्हणून निशानि क्र. १० वर अर्ज दाखल केलेला होता व तो मंजूर झालेला आहे म्हणून तुम्हास या जाहिर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, तुम्ही सदर अपिलाच्या संदर्भात आपले म्हणने मांडण्यासाठी या न्यायाधिकरणात स्वतः किंवा रितसर निर्धिष्ट केलेल्या विधिज्ञा मार्फत दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहूण सदरील अपिलास उत्तर दयावे व आपल्या बचावाचे कागदपत्रे या प्रकरणात सादर करावेत अन्यथा तुमच्या विरूध्द एकतर्फा आदेश करून या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीने व न्यायाधिकरणाच्या शिक्कया निशी देण्यात आले.

**आदेशावरून**
**(नागेश धोंडीराम चोले)**
**न्यायिक लिपीक शाळा न्यायाधिकरण, लातूर**

रासनिप्रा

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय**
सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय.टी.आय. समोर, नांदेड.
{ Email ID - ddr.nanded2017@gmail.com }

International Year of Cooperatives 2025

जा.क्रं. जिउनिनां/कक्ष-३/निवडणुक/प्रा.मत.यादी कार्यक्रम(ब)वर्ग संस्था/2010/२०२५ दिनांक :- २३ जुलै, २०२५.

**व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन २०२५ ते २०३० (ब वर्ग संस्था)**
**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम, १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम,२०१४ (सुधारणासह) चे नियम २ (तीन) (१ ते १२) आणि नियम (११) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. १५७४ दि. २२/०५/२०२० व जा.क्र. ४५/२५ दि. ०३/०१/२०२५ चे आदेशामधील सुचनेनुसार दिनांक **०१/०१/२०२५** या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या खालील नमूद सेवा सहकारी संस्थेच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | **सेवा सहकारी संस्था, म. बाऱ्हाळी, ता. मुखेड** |

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | **२८/०७/२०२५** | स. ११.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. मुखेड व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | **२८/०७/२०२५ ते ०६/०८/२०२५** | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | **१४/०८/२०२५** | कार्यालयीन वेळेमध्ये | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | **१८/०८/२०२५** | सायं.४.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. मुखेड व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |

(अशोक भिल्लारे)
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड.**

त,
. प्रस्तुत कार्यालयाचे व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. मुखेड यांचे सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी.
. अध्यक्ष/सचिव, संबंधीत संस्था यांना देऊन सुचीत करण्यात येते की, सदरील प्रारुप मतदार यादी आपले संस्थेच्या कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.
**त माहितीस्तव सविनय सादर.**
ा. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड.**

रासनिप्रा

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय**
सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय.टी.आय. समोर, नांदेड.
{ Email ID - ddr.nanded2017@gmail.com }

International Year of Cooperatives 2025

जा.क्रं. जिउनिनां/कक्ष-३/निवडणुक/प्रा.मत.यादी कार्यक्रम(ब)वर्ग संस्था/--------/२०२५ दिनांक :- २४ जुलै, २०२५.

**व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन २०२५ ते २०३० (ब वर्ग संस्था)**
**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम, १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम,२०१४ (सुधारणासह) चे नियम २ (तीन) (१ ते १२) आणि नियम (११) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. १५७४ दि. २२/०५/२०२० व जा.क्र. ४५/२५ दि. ०३/०१/२०२५ चे आदेशामधील सुचनेनुसार दिनांक **०१/०१/२०२५** या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या खालील नमूद कर्मचारी पतसंस्थेच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | **विद्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. जि. नांदेड** |

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | **२८/०७/२०२५** | स. ११.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | **२८/०७/२०२५ ते ०६/०८/२०२५** | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | **१४/०८/२०२५** | कार्यालयीन वेळेमध्ये | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | **१८/०८/२०२५** | सायं.४.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |

(अशोक भिल्लारे)
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड.**

**प्रत,**
१. प्रस्तुत कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी.
२. अध्यक्ष/सचिव, विद्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. जि. नांदेड यांना देऊन सुचीत करण्यात येते की, सदरील प्रारुप मतदार यादी आपले संस्थेच्या कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.
**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
मा. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड.**




# गोदातीर समाचार






## सीआरपीएफचा ८७ वा स्थापना दिवस उत्साहात साजरा





**नांदेड (प्रतिनिधी)–** मुदखेड येथे सेंट्रल ट्रेंनिग महाविद्यालयात केंद्रीय रिझर्व्ह पोलीस फोर्स (सीआरपीएफ) दलाचा ८७ वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महानिरीक्षक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य ख्वाजा सजनुद्दीन यांनी सर्व अधिकारी, जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा देऊन सीआरपीएफ दलाच्या गौरवशाली इतिहासावर प्रकाश टाकला. सीआरपीएफची स्थापना २७ जुलै १९३९ रोजी नीमच मध्यप्रदेश येथे क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हज पोलीस म्हणून झाली. स्वातंत्र्यानंतर त्याची पुनर्रचना केंद्रीय राखीव पोलीस दल म्हणून करण्यात आली. तेव्हापासून दरवर्षी २७ जुलै हा दिवस स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.

यावेळी महानिरीक्षकांनी शहीद सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. क्वार्टर गार्डमध्ये त्यांना मानवंदना देण्यात आली आणि विशेष सैनिक संमेलनाला संबोधित करताना त्यांनी देशसेवेतील सैन्याच्या शिस्त, वचनबद्धता आणि योगदानाचे कौतुक केले.

स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुदखेड शहरात भव्य सायकल रॅली, सामुहिक वृक्षारोपण आणि केंद्रीय विद्यालयातील मुलांसह संस्थेच्या कॅम्पमधील मुलांसाठी विविध श्रेणीमध्ये चित्रकला स्पर्धा यांचा समावेश होता. यासोबतच प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थींमध्ये उत्साहाने क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष दिनानिमित्त सर्वांना एकता आणि उत्सवाचा अनुभव देण्यासाठी संस्थेच्या सर्व कॅन्टीनमध्ये बडा खाना या विशेष सामूहिक मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते.

कमांडंट कम चीफ ट्रेनिंग ऑफिसर वेदप्रकाश त्रिपाठी, डेप्युटी कमांडंट अरुण कुमार आणि मोहम्मद शाहनेवाज, असिस्टंट कमांडंट करणजीत सिंग आणि वासुदेव, वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश कुमार आणि संस्थेचे अधीनस्थ अधिकारी, सैनिक, प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी या प्रतिष्ठित कार्यक्रमास उपस्थित होते.

## सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाल्याने सरपंच व एक सदस्य अपात्र; औरंगाबाद खंडपीठाचा आदेश



**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील कलंबर (बु.) ग्रामपंचायतीच्या गावठाण जागेवरील अतिक्रमण व अंगणवाडीची जागा सरपंच पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या नावाने लावण्याचे काम केल्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिकाकर्त्याने याचिका दाखल केली होती. सदर खटल्याचा निकाल जाहीर झाला असून, न्यायालयाने सरपंच व एक सदस्य यांना सरकारी जमीन लाटल्याप्रकरणी दोषी ठरवत त्यांना अपात्र केले.

कलंबर (बु.) ता. लोहा येथील महिला सरपंच विमलबाई मन्नूसिंग ठाकूर व त्यांचे ग्रामपंचायत सदस्य पती मन्नूसिंग ठाकूर यांनी पदाचा दुरुपयोग करून गावातील सरकारी गावठाण जमीन आणि अंगणवाडीची जागा स्वतः च्या नावे लावून घेतली, अशी याचिका याचिकाकर्ते ग्रा. पं. सदस्य सुनील मुक्कनवार यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश रोहित जोशी यांनी सर्व साक्षी-पुरावे तपासून निर्णय दिला. सरपंच पती-पत्नींचा दावा फेटाळून लावत न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की, सदर मालमत्ता ही गावठाणच्या हद्दीत असून, ती शासकीय मालमत्ता आहे. त्यामुळे सरपंच आणि सरपंच महिलेचे ग्रामपंचायत सदस्य पती यांना अपात्र ठरवून सदरील जागेचा ताबा ग्रामपंचायतीकडे देण्यात यावा असा निर्णय दिला. याचिकाकर्ते ग्रा. पं. सदस्य सुनील मुक्कनवार यांच्या बाजूने अ‍ॅड. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

## देशाच्या प्रगतीत चार्टर्ड अकौन्टंट्सचे मोठे योगदान –असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सीए चरणज्योतसिंघ नंदा

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशाच्या प्रगतीत चार्टर्ड अकौन्टंट्सचे मोठे योगदान आहे. सी.ए.च्या विद्यार्थ्यांनी जिद्द, आत्मविश्वास आणि चिकाटीने या क्षेत्रात आपली प्रगती साधली पाहिजे, कठोर परिश्रम घेतल्यास यशाचे अत्युच्चर शिखर गाठणे सहज शक्य होईल, असा कानमंत्र चार्टर्ड अकौन्टंट्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सीए चरणज्योतसिंघ नंदा यांनी येथे दिला.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात असोसिएशनच्या नांदेड शाखेच्यावतीने आयोजित विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनपर मेळाव्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय सदस्य दुर्गेश काबरा, उमेश शर्मा, पियुष छाजेड यांचीही उपस्थिती होती.



पुढे बोलताना सीए नंदा म्हणाले, नांदेड येथील शाखेचे कामकाज प्रगतीपथावर आणि समाधानकारक असून, सुमारे ३०० हून अधिक विद्यार्थी या शाखेच्या माध्यमातून चार्टर्ड अकौन्टंटचे शिक्षण घेत आहेत. या शाखेच्या इमारत उभारणीचा प्रस्ताव आल्यास त्यावर असोसिएशन सकारात्मक विचार करील, असेही त्यांनी सांगितले. देशभरात असोसिएशनच्या एकूण १७५ शाखा आहेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी असोसिएशनच्यावतीने शिष्यवृत्तीची योजना उपलब्ध असून हजारो विद्यार्थी या शिष्यवृत्तीचा लाभ घेत आहेत. या क्षेत्रातील कायद्यात वेळोवेळी होत असलेले बदल, त्यामुळे येणाऱ्या अडचणी याविषयी पत्रकारांनी त्यांना विचारले असता ते म्हणाले, असोसिएशनच्यावतीनेही कायदेशीर बाबींची पडताळणी होत असते, त्यामुळे सध्या तरी शासनाच्या निर्णयाविषयी अथवा बदलत्या कायद्याविषयी कुठल्याही तक्रारी नाहीत.

तत्पूर्वी सकाळच्या सत्रात झालेल्या मार्गदर्शनपर मेळाव्यात सीए चरणज्योतसिंघ नंदा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केला. या कार्यशाळेचा सुमारे दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. त्यासाठी नांदेड शाखेचे चेअरमन जयप्रकाश भराडिया, सचिव आनंद गर्क, व्हाईस चेअरमन विजय काकाणी, कोषाध्यक्ष सागर शर्मा आदींसह शाखेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**नांदेड –** माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून युवक काँग्रेसचे पांडुरंग दशरथ कल्याणकर, राष्ट्रवादीचे दीपक कल्याणकर, तुकाराम कल्याणकर यांच्यासह पिंपळगाव (म) ता. अर्धापूर येथील अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, सभापती संजय लहानकर, अध्यक्ष बालाजी गव्हाणे, युवा मोर्चाचे अजय देशमुख, हेमंत देशमुख, सुभाष देशमुख, प्रमोद कल्याणकर आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.




**नांदेड –** महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा नांदेडतर्फे गुणवंतांचा सत्कार व गुरूगौरव पुरस्कार सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुंबई येथील मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, तहसीलदार विनोद गुंडमवार, उद्योजक सागर रूकारी, उद्योजक माधवराव पटणे, महाराष्ट्र वीरशैव सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हुरणे, कार्याध्यक्ष जयचंद्र तत्तापुरे, सरचिटणीस राजन मिसाळे, युवा आघाडीचे अध्यक्ष अविनाश मारकोळे पाटील, प्रभाकर उदगीरे, रितेश बुरांडे, अमोल नागठाणे, गुरूराज पाटील, केदार नागठाणे आदी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## श्रावणमासानिमित्त श्री नगरेश्वर वैश्य मंदिर येथे स्फटिक महादेव अभिषेक पूजनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफा नांदेडच्यावतीने श्रावणमासानिमित्तप्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी दि. २५ जुलै ते २३ ऑगस्ट दरम्यान सायंकाळी ६ ते ८ या वेळेत स्फटिक महादेव अभिषेक पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष असून, याहीवर्षी भाविक बंधू-भगिनी प्रचंड संख्येने सहभाग घेत आहेत.



स्फटिक महादेव अभिषेक पूजन यजमानाकरिता मंदिराच्या वतीने गुरूवर्य गोपाळगुरू कुरूंमट्टे यांच्या मार्गदर्शनात आणि मंदिराचे अध्यक्ष भागवत गंगमवार, सचिव सुरेश कोटगिरे व कोषाध्यक्ष पांडुरंग येरावार यांच्या व्यवस्थापनात परिपूर्ण सामग्रीसह व्यवस्था करण्यात येत आहे. तरी इच्छुक भाविक बंधू-भगिनींनी अधिक माहितीकरिता श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफा नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनुसयाबाई केशवराव शिंदे यांचे निधन



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** केसराळी येथील ज्येष्ठ महिला अनुसयाबाई केशवराव पाटील शिंदे यांचे वृद्धापकाळाने दि. २७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. २८ जुलै रोजी सकाळी १० वाजता केसराळी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक, नांदेड हेड ऑफीस येथील कर्मचारी भीमराव पाटील शिंदे यांच्या त्या आई होत.


## आनंदराव जाधव यांचे निधन



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील हिप्परगा माळ येथील ज्येष्ठ नागरिक आनंदराव माणिका पा. जाधव यांचे वयाच्या ७० वर्षी दि. २६ जुलै रोजी रात्री ८.५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. २७ जुलै रोजी दुपारी १ वाजता. हिप्परगा(माळ) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, नातू-नातवंडे असा परिवार आहे.

## कै. लक्ष्मीबाई शिंदे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना शिंदे गटाचे नांदेड दक्षिण तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे यांच्या मातोश्री कै. लक्ष्मीबाई कोंडीबा पाटील शिंदे यांचे शनिवार, दि. २६ जुलै रोजी निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि. २७ जुलै रोजी दुपारी १ वा. वैकुंठधाम सिडको स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आ. हेमंत पाटील, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, शिवसेना नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्यासह जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे, सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटू पाटील शिंदे, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## सिडको ते शिर्डी पदयात्रेचे सिडको परिसरात विविध ठिकाणी जल्लोषात स्वागत


**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – श्री हुजूर साहेब नांदेड सिडको साईबाबा नगर बिडी कॉलनी साईबाबा मंदिर येथून २७ जुलै रोजी शिर्डीकडे पदयात्रा निघाली. या पदयात्रेचे सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावर रांगोळी, फटक्यांची आतिषबाजी ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. तसेच विविध ठिकाणी महाआरती, अन्नदानाचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे यांच्यासह लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटना व महिला, युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दर वर्षीप्रमाणे सलग १४ व्या वर्षी नांदेड हुजूर साहेब ते शिर्डी पालखी सोहळा २७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता साईबाबा नगर बिडी कामगार कॉलनी सिडको येथून



महाआरतीने प्रारंभ झाला. यावेळी वैजनाथ देशमुख, विनोद कांचनगिरे, डॉ. नरेश रायेवार, जयश्री जायस्वाल, सुषमा गहिरवार यांच्यासह अध्यक्ष गणेश जैस्वाल, नागोराव वाघमोडे, गणेश भद्रे, मारोती वाघमारे, दत्ता लोंढे, शुभम, गणेश येवले, उबाळे पाटील, सोमेवाड, गौरव दरबस्तवार, राजू बच्चेवार, संदीप देवसरकर, संतोष जैस्वाल यांच्या पदयात्रेतील जवळपास १०० भाविक-भक्त सहभागी झाले होते. ही यात्रा ४१७ किलोमीटर आहे. यात पहिल्या दिवशी सिडको ते मरळक व नेवासा मार्ग शिर्डी येथे १० ऑगस्ट रोजी ४१७ किलोमीटर अंतर चालून ही पदयात्रा पोहचणार आहे.

सिडको-हडको परिसरातील निघालेल्या या पालखीचे अनेक ठिकाणी भव्य रांगोळी, फटाक्यांची आतिषबाजी, ढोलताशांच्या गजरात अनेक ठिकाणी स्वागत करण्यात आले. हडको भागातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या ठिकाणी मोहनराव घोगरे मित्र मंडळ तर सिडको येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळांच्या वतीने अन्नदान तर शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्यावतीने फटाक्यांची आतिषबाजीत स्वागत केले. माजी लोकप्रतिनिधी उदय देशमुख, माजी नगरसेविका ललिता शिंदे, सतिश बसवदे, राजू लांडगे, मोनू जोशी, राज पुरोहित, पिंटू महाराज, संजय काचावार, किशोर देशमुख, अशोक मोरे, राजू निखाते यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार, महिला, युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com